बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | शुक्रवार,दि.२७जुलै २०२४ | वर्षे३रे | अंक३६२वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## राजकारणाला चित्रपट समजतात

मुंबई: मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात आगामी विधानसभेची निवडणूक स्वबळावर लढण्याची घोषणा केली. मनसे सत्तेत आली पाहिजे, यासाठी आपण २२५ ते २५० जागा लढवायच्या आहेत, अशी घोषणाच त्यांनी केली. मात्र, लोकसभा निवडणुकीत राज ठाकरेंनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता. पण आता विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी स्वतंत्र निवडणूक लढण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे राज ठाकरे यांच्या बदलत्या भूमिकेवरून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते, आमदार जितेंद्र आव्हाड यांनी टीका केली आहे. राज ठाकरे हे राजकारणाला चित्रपट समजतात,अशी बोचरी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे.



# जेवढं गोडी गुलाबीने घ्याल तेवढं तुमच्यासाठी चांगलं!!

## मनोज जरांगेंचा फडणवीसांना पुन्हा इशारा



- ओबीसीतून आरक्षण देण्याची जरांगेंची मागणी
- सरसकट कुणबी प्रमाणपत्राला होतोय विरोध
- मराठा अन् ओबीसी नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांनी फडणवीसांना एकदा इशारा दिला. जेवढं गोडी गुलाबीने घ्याल तेवढं तुमच्यासाठी चांगलं, असं जरांगे यांनी म्हटलं आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न चांगलांच चर्चेत आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी राज्य सरकारकडे केलेली आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जरांगे यांनी अनेकदा उपोषणही केलं आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, अशी प्रमुख मागणी मनोज जरांगे यांनी केलेली आहे. मात्र, त्यांच्या या मागणीला ओबीसी समाजाने विरोध केला आहे. दुसरीकडे ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नांसदर्भात लक्ष्मण हाके यांनी जनआक्रोश यात्रा सुरु केलेली आहे. सध्या मराठा आणि ओबीसी नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. त्यामुळे मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न पुन्हा तापला आहे.

अशातच मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात एका प्रकरणात अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. यावरून मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला. मला कारागृहात टाकल्यास भाजपाच्या सर्व उमेदवारांना निवडणुकीत पाडा, असं विधान मनोज जरांगे पाटील यांनी केलं. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनीही त्यावर प्रतिक्रिया दिली होती. यानंतर आज पुन्हा मनोज जरांगे पाटील यांनी फडणवीसांना इशारा दिला.

जेवढं गोडी गुलाबीने घ्याल तेवढं तुमच्यासाठी चांगलं, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.मला याबाबत आधी नोटीस दिली नव्हती. मी कायद्याचा सन्मान करणारा माणूस आहे. न्यायालयाचा अवमान कधीही आम्ही होऊ दिला नाही आणि पुढेही होऊ देणार नाहीत.

पण आता आधी नोटीस दिली नाही, थेट वॉरंट काढलं. बर वॉरंट जरी काढलं असलं तरी त्या प्रकरणात माझा काहीही संबंध नाही. माझा संबंध नसला तरी मला बदनाम करण्याचा प्रयत्न सुरु आहे. देवेंद्र फडणवीसांचा मला उघडं पाडण्याचा हा प्रयत्न आहे. पण त्यांनी हे काम करू नये, आमचे लोक फोडून त्यांना पत्रकार परिषदा घ्यायला लावू नये. आता तुम्ही जेवढं गोडी गुलाबीने घ्याल तेवढं तुमच्यासाठी चांगलं राहिल, मी आता एवढंच सांगतो, असा इशारा मनोज जरांगे यांनी देवेंद्र फडणवीस यांना दिला.

### मनोज जरांगे काय म्हणाले?

एका प्रकरणात त्यांना अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे, याबाबत बोलताना मनोज जरांगे म्हणाले, देवेंद्र फडणवीसांना हे माहिती नाही की याआधी १३ ते १४ वर्षात काहीच झालं नाही. मग असं अचानक काय झालं? मग मीच का? असे राज्यात किती गुन्हे आहेत? कारण दोन्हीही खाते तुमच्याकडे आहेत. मी गोरगरीबांसाठी लढतो म्हणून तुम्ही मला हेरलं का?, असा सवाल जरांगे यांनी केला.

## ड्रीम प्रोजेक्टला केंद्र सरकारचा आर्थिक बूस्टर

### प्रितम मुंडे : रेल्वेसाठी दोनशे पंचाहात्तर कोटींची तरतूद

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पात रेल्वे विभागाकरिता दोन लाख बासष्ठ हजार कोटींची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. या तरतूदीतून नगर-बीड-परळी रेल्वे प्रकल्पासाठी दोनशे पंचाहात्तर कोटी रुपये मिळणार आहेत. बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी रेल्वेकरिता अर्थसंकल्पात तरतूद केल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

बीड जिल्ह्याच्या जिव्हाळ्याचा असलेला नगर-बीड-परळी रेल्वे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने दिलेल्या निधीकरिता आभार मानताना डॉ. प्रितमताई मुंडे म्हणाल्या कि 'हा रेल्वे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने वेळोवेळी आर्थिक तरतूद करून प्रकल्पाला गती देण्याचे काम केले

पान २ वर...

## महापूर सांगलीच्या वेशीवर!

### अस्मानी : ४० कुटुंबांचे स्थलांतर,अलमट्टीचा विसर्ग ३ लाखावर

सांगली/पुण्यभूमी प्रतिनिधी

कोयना, चांदोली धरणातून वाढविण्यात आलेल्या पाण्याच्या विसर्गामुळे सांगलीच्या उंबरठ्यावर महापूर उभा ठाकला असून मिरजेतील कृष्णाघाट येथे पाण्याने इशारा पातळी गाठली आहे. सांगलीतील सुर्यवंशी, इनामदार प्लॉट येथील ४० कुटुंबांनी गुरूवारपर्यंत स्थलांतर केले असून पाणी पातळी आणखी वाढण्याची शक्यता असून आयर्विन पूलाजवळ ३५ फूटापर्यंत पातळी जाउ शकेल असा कयास आहे.




गेले काही दिवसापासून संततधार पाउस कोसळत असून यामुळे कृष्णा खोर्यातील नाले, ओढे दुथडी भरून वाहत आहे. यामुळे कृष्णा, वारणा या नद्या दुथडी भरून वाहत असतानाच चांदोली व कोयना धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला असून यामुळे नदीतील पाणी पातळी वाढत आहे. गुरूवारी कोयना धरणातून विसर्ग वाढविण्यात येत असल्याचे जलसंपदा विभागाकडून कळविण्यात आले असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.आयर्विन पूलाजवळ नदीतील पाणी पातळी गुरूवारी सायंकाळी चार वाजता ३२ फूट ११ इंचावर पोहचली असून मिरजेतील पाणी पातळी ४५ फूट ५ इंच झाली असून इशारा पातळी ४५ फूट आहे. इशारा पातळीपेक्षा ५ इंच पाणी पातळी जादा असल्याने कुरणे वस्तीची वाट बंद झाली आहे. या परिसरातील जनावरे मिरजेत सुरक्षित स्थळी हलविण्यात आली आहेत.

मिरज व सांगली येथील स्मशानभूमी पाण्याखाली गेल्या असून मिरजेसाठी पंढरपूर मार्गावर अंत्यविधीची व्यवस्था करण्यात आली आहे. तर सांगलीसाठी कुपवाडमधील स्वामी मळा स्मशानभूमीमध्ये

पान २ वर...

## शिक्षकांचे महाएल्गार भीक मांगो आंदोलन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालयातील कार्यरत ६३ हजार शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १ जानेवारी २४ पासून प्रचलित नियमानुसार टप्पा वाढ अनुदान मिळावे , निधीसह शासन निर्णय निर्गमित करावा या मागणीसाठी राज्यभर जिल्हास्तरावर १२ जुलै पासून शिक्षक समन्वय संघाच्या वतीने साखळी आंदोलन सुरू आहेत. ३१ जुलै पर्यंत वाढीव टप्पा अनुदान निधी देण्याचा शासन निर्णय न झाल्यास १ ऑगस्ट पासून आझाद मैदानावर ६३ हजार शिक्षकांसह आंदोलन करण्याचा इशारा शिक्षक समन्वय संघाच्या वतीने देण्यात आला आहे.

गेल्या दिवाळी मध्ये शिक्षक समन्वय संघाच्या वतीने आझाद मैदानावर केलेल्या आंदोलना वेळी शिक्षणमंत्री यांनी मिठाई देवून आंदोलन सोडले व टप्पा वाढ देण्याचे लेखी आश्वासन दिले होते. या अनुषंगाने नुकत्याच झालेल्या अधिवेशनामध्ये शिक्षण मंत्र्यांनी टप्पा वाढीबाबत गोलगोल घोषणा केल्याने हजारो शिक्षकांनी रोष व्यक्त केला. गोल गोल घोषणा करुन फसवण्याचा शासनचा डाव शिक्षकांनी ओळखला असून जोवर

पान २ वर...

## उमापूर ग्रामस्थ कारभाराला कंटाळले!

### संतप्त : रस्त्याच्या मागणीसाठी ग्रामसेवकाला निवेदन



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघातील मोठी बाजारपेठ समजल्या जाणाऱ्या उमापूर गावातील ग्रामस्थ ग्रामपंचायत सरपंचाच्या निष्काळजीपणा आणि ग्रामसेवकाच्या गलथान कारभाराला कंटाळले आहेत. गावांतर्गत व बाहेरील रस्ते खराब झाल्यामुळे विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना मोठ्या अडचणीला तोंड द्यावे लागत असून रस्त्याच्या मागणीसाठी संतप्त झालेल्या ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांनी ग्रामसेवक यांना निवेदन देऊन आपल्या मागण्या मांडल्या आहेत.

गेवराई तालुक्यातील मोठी बाजारपेठ समजलेल्या समजल्या जाणाऱ्या उमापूर गावामध्ये विद्यमान ग्रामपंचायतच्या सरपंचाच्या हेकेखोर आणि गलथान कारभारालामुळे गावातील प्रश्न धूळखात पडले आहेत. ग्रामपंचायत सदस्यही या कारभाराला वैतागले आहेत. रस्त्याचा प्रश्न, दुषीत पाणी पुरवठ्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असून गावांतर्गत रस्ते खड्ड्यात गेल्यामुळे ग्रामस्थांना ये जा करण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. उमापूर गावाला जोडणारे अवती भवतीचे रस्ते सुद्धा खराब झाल्यामुळे

पान २ वर...

## परळीतून फुंकले विधानसभेचे रणसिंग

### प्रकाश शेंडगे परळी निवडणूक रिंगणात

### ओबीसी बहुजन पार्टी ठरणार किंगमेकर: प्रा.मुंडे

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्रामध्ये होऊ घातलेल्या विधानसभा विधानसभा निवडणुकीत ओबीसी बहुजन पार्टीचे २८८ जागेवर उमेदवार उभे करणार असल्याचे रणसिंग परळीतून ओबीसी बहुजन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश अण्णा शेंडगे यांनी फुंकले तर विधानसभा निवडणुकीत ओबीसी बहुजन पार्टी ही किंग मेकर च्या भूमिकेमध्ये असेल असे प्रतिपादन पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा.टी.पी.मुंडे सर यांनी केले. परळीत आयोजित केलेल्या मराठवाडा विभागाच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते.

परळी येथील श्रद्धा मंगल कार्यालय येथे ओबीसी बहुजन पार्टीच्या वतीने आयोजित मराठवाडा विभागाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात मराठवाड्यातील आठ ओबीसी बांधवांची तसेच प्रतिनिधींची लक्षणीय उपस्थिती होती. या मेळाव्यात अनेक पदाधिकाऱ्यांनी आपली मते व्यक्त केली. हा मेळावा सकाळ व दुपार अशा दोन सत्रात संपन्न झाला. मेळाव्यात सुरुवातीला महापुरुषांना पुष्पहार अर्पण करून तसेच दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.




या मेळाव्यात ओबीसी बहुजन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश अण्णा शेंडगे यांनी अनेक विषयावर भाष्य केले येणारी विधानसभा ही ओबीसी विरुद्ध मराठा अशी होईल. महाराष्ट्रामध्ये मराठा समाज आठ ते बारा टक्के एवढा आहे त्या तुलनेने ओबीसी समाज ६० ते ६५ टक्के आहे त्यामुळे ओबीसींनी एकत्र येण्याची गरज आहे. सध्या महाराष्ट्रामध्ये समाजात भांडणे लावण्याचा प्रकार सुरू असून हा प्रकार निंदनीय आहे तसेच जरांगे यांनी पाडापाडीची भाषा करू नये असेही त्यांनी म्हटले. छोट्या ओबीसींना सोबत घेऊन यापुढे पक्ष वाटचाल करणार असल्याचेही ते म्हणाले. पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा.टी.पी.मुंडे सरांनी बोलताना म्हटले की, सरकारकडून ओबीसी आरक्षण संपुष्टात आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत मात्र ते आपण होऊ देणार नाही अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली तसेच मराठा समाजाला आपला विरोध नाही गरीब मराठ्यांना आरक्षण दिले पाहिजे परंतु ओबीसी

पान २ वर...



# आठवेल का सारे!

स्वतंत्रपणे विचार करून बराच काळ लोटला अशा एका वर्गाकडून देशाच्या औद्योगिक अवस्थेसाठी पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांस बोल लावले जातात. त्यांच्या मते पं. नेहरू यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्याने आपली अवस्था अर्थव्यवस्थेच्या मुद्द्यावर ना इकडे ना धड तिकडे अशी झाली. सार्वजनिक उपक्रम नावाने केंद्र सरकारने जनतेच्या पैशाने जे काही उपक्रम सुरू केले ते पांढरे हत्ती ठरले आणि या सरकार-केंद्री विकासधोरणामुळे आपण खासगी उद्योजकांसही पूर्णपणे उत्तेजन देऊ शकलो नाही. वास्तविक पं. नेहरू यांस मिश्र व्यवस्थेचा आधार घ्यावा लागला कारण नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशात भांडवलदारांची संख्या मूठभरही नव्हती आणि जागतिक भांडवलदारांस देशात गुंतवणूक करण्याइतका विश्वास नव्हता. त्यामुळे सरकारपुढे स्वत:च भांडवल ओतण्याखेरीज अन्य काही पर्याय राहिला नाही. तशाही परिस्थितीत होत्या त्या खासगी उद्योजकांस मोकळे रान दिले असते तर आता जसा दोन उद्योगगृहांची धन करणारी धोरणे आखत असल्याचा आरोप विद्यामान सरकारवर होतो तसा तो पं. नेहरू यांच्यावर झाला असता. सबब परिस्थितीची अपरिहार्यता म्हणून त्यांस सरकारी कंपन्या सुरू कराव्या लागल्या, असा युक्तिवाद करता येईल. तसे काही करणे हा प्रस्तुत संपादकीयाचा मुळीच विचार नाही. तर पं. नेहरू यांनी आखून दिलेल्या समाजवादी पायवाटेचे रूपांतर राष्ट्रीय महामार्गात व्हावे या हेतूने ताजा अर्थसंकल्प किती आणि कसे प्रयत्न करतो हे दाखवून देणे हा यामागील विचार. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच खरे पं. नेहरू यांचे समाजवादी उत्तराधिकारी कसे ठरतात, हेही लक्षात येईल.विद्यामान सरकारचे तिसरे समाजवादी लक्षण म्हणजे ''श्रीमंतांस लुटावे आणि गरिबांत वाटावे'' हा अर्थविचार. 'स्मॉल टर्म' आणि 'लाँग टर्म'- अल्पमुदत व दीर्घमुदत- अशा दोन्ही तऱ्हेच्या गुंतवणुकीवर वाढवण्यात आलेला कर हे त्याचे उदाहरण. बँकांतील साध्या बचतीतून फारसे काही हाती लागत नाही म्हणून गुंतवणूकदार भांडवली बाजारात वा तत्सम ठिकाणी गुंतवणूक करतो. यातील सगळेच गुंतवणूकदार असतात असे नाही, हे खरे. पण सगळे गुंतवणूकदार भांडवली बाजाराचा उपयोग सट्टेबाजाराप्रमाणे करून दोनाचे चार करणारे सटोडिये नसतात हेही खरे. अलीकडे एक चांगला मध्यमवर्ग नियमितपणे, हप्त्याहप्त्याने म्युच्युअल फंड वा तत्सम मार्गाने भांडवली बाजारात गुंतवणूक करत असतो. मुलाबाळांचे शिक्षण, विवाह आदी दूर पल्ल्यांच्या कारणांसाठी ही गुंतवणूक केली जाते. तिच्यावरील करात या अर्थसंकल्पात सणसणीत वाढ करण्यात आली असून नफेखोरीसाठी पैसे लावणाऱ्या सटोडियांप्रमाणे दीर्घकालीन गुंतवणूकदारांवरील करभार वाढवण्यात आलेला आहे. म्हणजे ''तुम्ही दरिद्री व्हा, सरकार तुमचे पालन-पोषण करेल; पण कमवाल तर याद राखा'' असाच जणू अर्थविचार सरकारी धोरणांतून समोर येतो. एके काळी रेल्वेच्या खासगीकरणासाठी समिती नेमण्यात आली होती आणि या खासगीकरणाच्या माध्यमांतून रेल्वे सुधारणांसाठी भांडवल उभारणीचा विचार करण्यात आला होता. पण एका निवडणुकीत बसलेल्या दणक्याने सगळेच चित्र पालटलेले दिसते.वास्तविक अशा वेळी स्पर्धात्मक प्रक्रियेद्वारे (कॉम्पिटिटिव्ह प्रोसेस) सरकारी क्षेत्रे खासगी उद्याोजकांस खुली करून भांडवल उभारणी करता येते. पण या मार्गापेक्षा निवडक प्रक्रियेद्वारे काही ठरावीक उद्योग समूहांस कसा लाभ मिळेल याकडे सरकारचा कल दिसतो. या मार्गाने सगळ्यांचे भले होण्याऐवजी काही मूठभरांचे भले होते आणि हे मूठभर या भल्याची परतफेड सत्ताधीशांना करतात. काँग्रेसच्या कथित 'भ्रष्ट' कालखंडात हेच तर झाले आणि एक उद्योग तेवढा मोठा होत गेला असा आरोप तेव्हा विरोधी पक्षात असलेल्या भाजपकडून सर्रासपणे केला जात असे. विरोधात असताना विरोध केलेली धोरणे सत्ता मिळाल्यावर आपणही राबवायची असतात याचा परिचय देणाऱ्या अनेक निर्णयांप्रमाणे हेही! त्यामुळे 'मिनिमम गव्हर्नमेंट, मॅक्झिमम गव्हर्नन्स', 'गव्हर्नमेंट हॅज नो बिझनेस टु बी इन बिझनेस' इत्यादी सुविचार आता कोणी उपचार म्हणूनही उच्चारत नाही. ताजा अर्थसंकल्प हे सुविचार आठवण्याची आणि मंगेश पाडगावकरांनी सुमन कल्याणपूर यांच्या आवाजात विचारलेला 'तुला ते आठवेल का सारे' हा प्रश्न बराच काळ विचारस्तब्ध झालेल्यांस 'पुसण्याची' संधी देतो.'

# समकालीन भवतालचा अंतर्बाह्य वेध घेणारा लेखक : बालाजी सुतार

जागतिकीकरणामुळे जे आमूलाग्र बदल झाले त्या विविधांगी बदलांचा अंतर्बाह्य वेध आपल्या सकस लेखणीतून घेणाऱ्या साहित्यकाराची अर्थातच बालाजी सुतार यांची मराठवाडा साहित्य परिषद अंबाजोगाई शाखेच्या वतीने आयोजित ११ व्या आंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली आहे.हे विलक्षण आनंददायी आहे. खराखुरा लेखक संमेलनाध्यक्ष होतो आहे. हे ऐकून-वाचून लई भारी वाटतंय!

अंबाजोगाईच्या साहित्य संमेलनाध्यक्ष निवडीच्या प्रथा आणि परंपरेनुसार पुर्वाध्यक्ष प्रख्यात कवी-गीतकार डॉ. दासू वैद्य यांनी बालाजी सुतार यांचं नाव बंद लिफाफ्यात अंबाजोगाईच्या मसाप कार्यकारिणीला कळवलं. पूर्वाध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक दासू वैद्य,मसाप कार्यकारिणी अध्यक्ष दगडू (दादा) लोमटे, सचिव गोरख शेंद्रे, अमर हबीब ,डॉ. राहुल धाकडे,सर्व सदस्य, स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांचं मनःपूर्वक अभिनंदन !

हा बहुमान ग्रामीण भागातील लिहित्या हातांचा नावलौकिक वाढवणारा आहे.या पूर्वीही महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा इस्लामपूर व राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनी, इस्लामपूर आयोजित २८ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदाचा सन्मानही साहित्यिक बालाजी सुतार यांना मिळलेला आहे .कोण किती मोठा कलाकार - साहित्यकार आहे यापेक्षा त्याचे योगदान समाजात कसे रुजले आहे. मनामनांचा थांग त्याने कसा घेतला आहे हे महत्वाचे.साहित्यिक-कलावंत हा कधीच लहान-मोठा नसतो. हा तो वेगळा असतो म्हणूनन त्यात स्थर नसतो असे मला वाटते.साहित्यिक बालाजी सुतार यांच्या सारखे संतुलित लेखन करणारा दुसरा साहित्यिक दुर्मिळच!आजच्या परिस्थितीतील अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांचा परामर्श त्यांनी आपल्या साहित्य लेखनात घेतला आहे.मराठी भाषा जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्नशील असलेले आश्वासक लेखक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. एक संवेदनशील साहित्यिक असल्यामुळे देशातील प्रचलित वाढत्या असहिष्णुतेवर भाष्य करणारे लेखक म्हणून बालाजी सुतार सर्वपरिचित आहेत. झुंडशाहीसमोर शरण न जाता तिला फाट्यावर मारणारे सडेतोड लेखक म्हणून बालाजी सुतार वाचकांना अधिक



प्रा. डॉ.सिद्धार्थ तायडे
मो.९८२२८३६६७५

जवळचे वाटतात. माणूसपणाची संकल्पना पूर्ण करणारा लेखक अशी ओळख असणारे व्यक्तिमत्त्व बालाजी सुतार यांच्या 'दोन शतकांच्या सांध्यावरच्या नोंदी' या कथासंग्रहाला बी. रघुनाथ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आजवर महाराष्ट्रातील अनेक महत्वाचे पुरस्कार प्रतिभावान लेखक बालाजी सुतार यांना प्राप्त झाले आहेत.यामध्ये नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण केंद्रामार्फत देण्यात येणारा सन २०२० चा 'बाबूराव बागूल कथा पुरस्कार' बालाजी सुतार यांच्या 'दोन शतकांच्या सांध्यावरची नोंदी' या कथासंग्रहाला प्रदान करण्यात आला आहे.गडहिंग्लज येथील पूज्य साने गुरुजी सार्वजनिक ग्रंथालयातर्फे त्यांना साने गुरुजी साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

लेखक बालाजी सुतार आजच्या पिढीतले महत्त्वाचे लेखक आहेत.शब्द प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या त्यांच्या 'दोन शतकांच्या सांध्यावरची नोंदी' या पहिल्याच कथासंग्रहातून मराठी लघुकथेला एक नाव आयाम त्यांनी दिला आहे. आशययुक्त विलक्षण भाषाशैली, नव्या बदललेल्या जगाकडे पाहण्याची अनोखी दृष्टी, ग्रामीण भागातील बदलांचे सूक्ष्म निरीक्षण आणि कथावस्तूतील विषय वैविध्य हा लेखक आपल्या कथांमधून मांडतो. ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस या कथासंग्रहाबाबत म्हणतात, की लघुकथेच्या बंदिस्त परिघातून मराठी कथेला स्वतः चा मोकळा अवकाश प्राप्त करून देणाऱ्या आजच्या कथाकारांत बालाजी सुतार यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.त्यांचा हा कथासंग्रह आजच्या मराठी कथेला नवा स्वर प्राप्त करून देणारा आहे. आधुनिकीकरणाच्या रेट्याने भारताचा ग्रामीण भाग ढवळून निघाला आहे. शेतीच्या समस्या दिवसेंदिवस अक्राळविक्राळ रूप धारण करीत आहेत. कुटुंबे तुटत चालली आहेत. आणि तरीही गावांचा प्रवास सुरूच आहे.या प्रवासाचे अस्सल चित्रण म्हणजे बालाजी सुतार यांनी लिहिलेला 'गावकथा'हा दीर्घांक.एकूणच नाटकाच्या सर्वसाधारण व्याख्येला फाटा देणारे नाटक म्हणजे गाव कथा. इथे सरळ धोपट कथा अशी काही नसताना नाटक तुमचा ताबा घेते. वेगवेगळ्या प्रसंगांतून नाटक सुरू झाल्यावर काही काळ या मांडणीमधून कथेमध्ये प्रेक्षक म्हणून प्रवेश करायला वेळ लागतो. पण एकदा तुम्ही कथेमध्ये प्रवेश केला की मात्र तुम्ही तेथून बाहेर पडू शकत नाही.

कथा लिहिताना लेखक बालाजी सुतार यांनी गावातील अनेक गोष्टी अतिशय वास्तव पद्धतीने मांडल्या आहेत. कविमनाचा शेतकरी आणि त्याचे सोयाबीन जळून जाते, भावकीचा वाद, कुणब्याची व्यथा, सावकारी फास,गावात एसटीमध्ये फुलणारी आणि तिथेच कोमजणारी प्रेम कहाणी, प्रत्येक प्रसंगात गाव व्यवस्थेतील व्यथा अगदी सहज आपल्यापर्यंत पोचल्याशिवाय राहत नाही. हे नाटक आपल्याला अस्वस्थ करते. प्रत्येक पात्राची स्वतंत्र आशी कथा आपल्या समोर येते. भोवताल सोडुन कोणी संत होत नाही गावकथा म्हणते माझा अंत होत नाहीयाची विलक्षण प्रचिती म्हणजे बालाजी सुतारांची 'गावकथा' होय. एक संवेदनशील वाचक, लेखक, विचारवंत असलेल्या आमच्या सन्मित्राला साहित्य ११व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदाचा बहुमान मिळणे हा आनंद शब्दातीत तर आहेच पण त्या साहित्य संमेलनाची उंची देखील साहित्यिक बालाजी सुतार यांच्यामुळे वाढेल हे निश्चितच! समकालीन भवतालाचा अंतर्बाह्य

वेध घेणारे साहित्यिक आमचे सन्मित्र बालाजी सुतार (बासुदा) यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

# परीक्षेचा सुधारित निकाल जाहीर



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून देशात नीट परीक्षेच्या पेपरफुटीच्या प्रकरणाची चांगलीच चर्चा झाली. नीट परीक्षेच्या पेपरफुटीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवरील सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाने फेरपरीक्षा घेण्याची मागणी फेटाळून लावत नीट-यूजी फेरपरीक्षा होणार नाही, असा मोठा निर्णय दिला. त्यानंतर आता नॅशनल टेस्टींग एजन्सीने परीक्षेचा सुधारित अंतिम निकाल जाहीर केला आहे.

दरम्यान, आता नीटची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना शुरी.पींर.रल.ळप या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपला निकाल पाहता येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने फेरपरीक्षा घेण्याची मागणी फेटाळल्यानंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नीट यूजीचा सुधारित निकाल पुढील दोन दिवसांमध्ये जाहीर केला जाईल, असं सांगितलं होतं. त्यानुसार आज नीट यूजीचा सुधारित निकाल जाहीर करण्यात आला आहे. आता नीट युजीचा हा अंतिम निकाल असणार आहे.नीट यूजीची परीक्षेचे पेपर फुटल्याने देशभर गोंधळ उडाला होता. यानंतर हे प्रकरण थेट सर्वोच्च न्यायालयात पोहोचलं होतं. तसेच या प्रकरणात अनेकांना अटक झाली होती. तसेच या प्रकरणाचा तपास सीबीआयकडून करण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकरणाच्या याचिकेवर सुनावणी घेत असताना फेरपरीक्षा घेण्याची मागणी फेटाळून सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली होती. मात्र, पेपरफुटी प्रकरणात हे पूर्वनियोजित असल्याचा एकही पुरावा मिळाला नसल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं. त्यामुळे नीट-यूजी फेरपरीक्षा होणार नाही, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला होता.सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी निकाल देताना सांगितले होते की, सध्या आपल्याकडे असलेल्या पुराव्याच्या आधारे पेपरफुटी प्रकरण हे सुनियोजित पद्धतीने राबवविले गेले, हे सिद्ध होत नाही. त्यामुळे परीक्षेचे पावित्र्य भंग झाले, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही, असेही सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी निर्णय देताना म्हटलं होतं.

## पान एक वरून

**परळीतून फुंकले...**

मधून नको अशी परखड मत त्यांनी व्यक्त केले. मराठा समाजाला केंद्र व राज्याचे मिळून १८% आरक्षण आहे असे असताना ओबीसीचे आरक्षण कशासाठी मागता असा सवाल त्यांनी केला आहे. त्याचबरोबर मराठवाड्यामध्ये पक्ष बांधणीवर भर देणारा असून ओबीसींनी एकत्र येण्याची गरज आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये ओबीसी बहुजन पार्टीची भूमिका ही किंग मेकरची असेल. ओबीसी समाजातील अठरापगड जातीतील बांधवांनी एकत्र आल्यास महाराष्ट्रात क्रांती घडेल तसेच मुस्लिम दलित आणि छोटे ओबीसी बांधव यांना एकत्र करण्याचे ध्येय पक्षाचे आहे. महाराष्ट्रात मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणावर असून त्यांना सुद्धा निवडणुकीमध्ये प्रतिनिधित्व देण्यात येईल. पदाधिकाऱ्यांनी आपले पक्ष संघटन गाव पातळीपासून ते जिल्हा पातळीपर्यंत व त्यापुढे विभाग आणि महाराष्ट्र पोहोचवण्याची जबाबदारी खांद्यावर घेतली पाहिजे.ओबीसी बांधव पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पक्षाचे जिल्हाध्यक्ष विनायक गडदे, सूत्रसंचालन प्रा.संदीपान मुंडे यांनी तर आभार प्रदर्शन ओबीसी युवा नेते प्रा.विजय मुंडे यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला.

**उमापूर ग्रामस्थ कारभाराला...**

अनेक गावांचा उमापूर पासून संपर्क तुटला आहे. गावातील शाळेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना चिखल तुडवत शिक्षणासाठी जावे लागत आहे, त्याचबरोबर गावातील जेष्ठ नागरिकांना देखील चालताना या खराब रस्त्यामुळे धोका निर्माण झाला आहे. गावातील मूलभूत विकासाच्या प्रश्नाकडे ग्रामपंचायतच्या विद्यमान सरपंचाचे सपशेल दुर्लक्ष केल्यामुळे मोठी समस्या निर्माण झाली आहे. गल्लाभरु या नेतृत्वामुळे उमापुर गावाची दैना उडाली आहे. रस्त्याचे कामे सुरु करा, गावातील प्रलंबित मूलभूत प्रश्न सोडवा इत्यादी मागणीसाठी ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांनी ग्रामसेवकाला निवेदन दिले यावेळी शरद आहेर, अविनाश आहेर, संतोष कापसे, जुबेर कुरेशी, श्रीकिसन तवले, अविनाश कापसे, रमेश राऊत, पप्पु जाळे, अशोक तवले, पप्पु झाळे माऊली वीर, करण कापसे, बाळु वीर, अक्षय आहेर, ओमकार आहेर यांच्यासह सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते..

**शिक्षकांचे महाएल्गार...**

शासन निर्णय होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार शिक्षक समन्वय संघाच्या वतीने झाला आहे. लोकशाही मार्गाने सुरू असलेले साखळी आंदोलन,अन्नत्याग उपोषण याकडे शासन दुर्लक्ष करत असून या निषेधार्थ बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २६ जुलै शुक्रवार रोजी महाएल्गार भीक मांगो आंदोलन करण्याचा निर्णय शिक्षक समन्वय संघाच्या वतीने घेण्यात आला असून हजारोंच्या संख्येने शिक्षकांनी उपस्थित होण्याचे आवाहन समन्वयकांनी केले आहे.

**अन्नत्याग उपोषणाकडे शासनाची डोळेझाक** : शासन शिक्षकांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करत नसून या निषेधार्थ शिक्षक समन्वय संघाचे समन्वयक ज्ञानेश भाई चव्हाण सर,दिपक कुलकर्णी सर, रविकांत जोजारे सर हे २२ जुलै पासून साई जन्म भूमी पाथरी जिल्हा परभणी येथे अन्नत्याग उपोषण करत आहेत. शासनाचा कार्यकाळ दिड महिन्याचा राहीलेला आहे. शासन अनेक योजना जाहीर करत असून शिक्षकांच्या मागणीकडे दुर्लक्ष करत आहे. उपोषणकर्ते शिक्षकांची तब्येत खालावत चालली आहे, शासनाने शासन निर्णय निर्गमित करुन शिक्षकांची नाराजी दूर करावी. शासनाच्या विरोधात हजारो शिक्षक रस्त्यावर उतरतील व येणाऱ्या निवडणुकीत शासनाला परवडणार नाही.

**महापूर सांगलीच्या...**

अंत्यविधीची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती महापालिकेच्यावतीने देण्यात आली.जिल्ह्यातील चांदोली धरणात आज २९.९६ तर कोयना धरणात ७८.२९ टीएमसी पाणीसाठा झाला असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले. चांदोलीतून १० हजार ४६० तर कोयनेतून ११ हजार ५० क्युसेकचा विसर्ग सुरू होता. तथापि, कोयनेत पाण्याची आवक वाढती असल्याने गुरूवारी सायंकाळी सातवाजलेपासून २० हजार क्युसेकचा विसर्ग करण्यात येत आहे. यामुळे नदीपात्रातील पाणी पातळी वाढण्याची शक्यता असून सांगलीत पाणीपातळी ३५ फूटापेक्षा जादा होण्याचा अंदाज आहे. तर अलमट्टी धरणातूनही विसर्ग वाढविण्यात आला असून सायंकाळी ६ वाजलेपासून ३ लाख क्युसेकचा विसर्ग करण्यात येत आहे.कृष्णेतील पाणी पातळी वाढत असल्याने कर्नाळ रोड, काकानगर, दत्तनगर, शिवनगरआदी रहिवासी क्षेत्रातील नागरिक स्थलांतराच्या तयारीत आहेत. सांगली शहरातील ४० कुटुंबानी स्थलांतर केले असून पूरग्रस्तांसाठी खणभागातील शाळेत निवारा केंद्र सुरू करण्यात आले आहे. जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी २०.५ मि. मी. पावसाची नोंद झाली असून शिराळा तालुक्यात सर्वाधिक ५०.१ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.

**ड्रीम प्रोजेक्टला केंद्र सरकारचा....**

आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात देखील केंद्र सरकारने आपल्या रेल्वे प्रकल्पाकरिता दोनशे पंचाहत्तर कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे. या रेल्वे प्रकल्पासाठी मागील दहा वर्षांपासून सुरु असलेल्या माझ्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला केंद्र सरकारने नेहमीच सकारात्मक प्रतिसाद दिला आहे, आज पुन्हा एकदा केंद्र सरकारची आपल्या रेल्वे संदर्भात असलेल्या कटीबद्धतेची प्रचिती आली.आम्हा बीड जिल्हावासियांचे रेल्वेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी अर्थसंकल्पात भरीव तरतूद केल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी, अर्थमंत्री निर्मला सीतारामण जी, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव जी यांचे खूप खूप आभार' अशा शब्दात डॉ. प्रितमताई मुंडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

## पान सहा वरून

**खिडकीतून शिरला खरे...**

परीकडे सरकारचे साफ दुर्लक्ष असून फक्त सवंग प्रसिद्धी करीता विविध योजनांची घोषणाबाजी करीत आहेत. मात्र अशा खिळखिळ्या झालेल्या बस आणि रस्त्याने धूर ओकणाऱ्या गाड्या दुरुस्त कधी होतील? असा प्रश्न सामान्यांना पडला आहे.

**आश्वासनामुळे आंदोलन...**

यांनी लेखी दिले आहे की मा वैद्यकीय अधिकारी यांनी एक एफ आय आर पाथर्डी पोलीस स्टेशनमध्ये दाखल केला आहे त्यामध्ये शेवटची ओळ आहे की आकस्मित जळीत दाखल होणेस विनंती आहे असे एफ आय आर मध्ये म्हटले आहे मग तो एफ आय आर खरा की खोटा त्यात किती सत्य आहे हे आंदोलक छनराज क्षेत्रे हे न्यायालयात म्हणणे मांडणार आहेत. यावेळी आंदोलन कार्यकर्ते सी पी क्षेत्रे, भाऊसाहेब नवगिरे, सिध्दार्थ क्षेत्रे,सतिष साळवे ही हजर होते

**ॲड. शेख शफिक...**

कानावर घालताच शफिक भाऊ धावत येणार नाही असे होत नाही. फक्त आवाज द्या शफिक भाऊ समोर हजर असतात. यामुळे त्यांच्याकडे तरुण, ज्येष्ठ, वयस्कर सर्वजण आदराने पाहतात आणि आपल्या मनातील गोष्टी सांगतात. म्हणूनच ते सर्व बीड जिल्हावासियांच्या गळ्यातील ताईत झाले आहेत. विद्यार्थी दशेपासून चळवळीच्या माध्यमातून सामाजिक कार्यात हिरीरीने भाग घेऊन राजकारणात आलेले शफिक भाऊ आजही जवळपास ९० टक्के समाजकारण आणि १० टक्के राजकारण करतात. यामुळे त्यांच्याकडे राजकारणातील एक विश्वासार्ह व्यक्ती म्हणून पाहिले जाते अशा शफिक भाऊंनी कोल्हापूरच्या विशाळगड येथील गजापूर मधील पवित्र जामा मशीद वर उग्रवाद्यांनी हल्ला करून केलेल्या तोडफोडीनंतर बीड शहरातील बशीरगंज चौकात पुकारलेल्या निषेध आंदोलनात मुस्लिम समाजासह सर्व समाजातील नागरिकांनी अक्षरशः हजारोंच्या संख्येने जमा होत निषेध नोंदविला. या निषेध आंदोलनाच्या अपेक्षेपेक्षा जास्त यशस्वीतेमुळे शफिक भाऊंवर समाजातील तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांकडून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत असून आभार व्यक्त केले जात आहे.

**नुकसान झालेल्या पिकांचे...**

तात्काळ मदत मिळून देण्याकरिता सुयोग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी अशी लेखी निवेदनातून मागणी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे शेतकरी पुत्र खा. बजरंग (बप्पा) सोनवणे यांनी केली आहे.

**राष्ट्रीय मार्गाचे काम तीन...**

नाल्यासहीत काम होणार आहे.मात्र अजुनही ६० टक्के काम बाकी आहे. माजी मंत्री क्षीरसागर यांनी साकेतचे कंत्राटदार यांच्याशी संपर्क साधुन हे काम लवकरात लवकर पुर्ण करावे अशा सुचना दिल्या. त्यानुसार येत्या तीन महिन्यात हे काम पुर्ण करू असे आश्वासन दिले आहे. २४ किलोमिटर लांबीचा हा रस्ता असुन यात ६ पुलाची कामे असुन १६० कोटींचा हा रस्ता आहे.बीड शहरातून जाणार्या रस्त्याच्या लांबीत सहा किलोमिटर रस्ता काम होणार आहे.चौपदरी होणार्या या रस्त्यामुळे बीडचा हा भाग शहराच्या वैभवात भर घालणारा ठरणार आहे.तीन महिन्यात म्हणजे दिवाळीपुर्वीच या रस्त्याचे काम होणार असुन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे यासाठी पाठपुरावा करत आहेत.

**बालविवाह झाल्यास पोलिसांनी...**

सांगुनही समाज जागृती करूनही पालकांकडून तसेच नातेवाईकांकडून येणाऱ्या दबावामुळे बालविवाह घडत असतात.१०९८ चाइल्ड हेल्प लाईन वरून माहिती मिळाल्यास होणारे बालविवाह थांबविले दिले जात आहे. मात्र ते पुरेसे नसून पोलिसांद्वारे कडक कारवाई होत नसल्यामुळे बालविवाह होत असतात. हे थांबविण्यासाठी पोलिसांनी गुन्हा नोंदवून चार्जशीट दाखल करावे असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीत दिले.

**हारतुरे नको फक्त शुभेच्छांचा...**कधीच पटलेले नाही, त्याचबरोबर शिवशक्ती परिक्रमा असो की अन्य सर्व वेळी आपण भरभरून माझे कौतुक करतच असता. यावेळी परिस्थिती वेगळी आहे. आपल्या काही बांधवांनी आत्महत्या केल्याच्या घटना या अतिशय वेदनादायी आहेत. या पार्श्वभूमीवर माझा वाढदिवस उत्सवी स्वरूपात साजरा करणे माझ्या मनाला न पटणारे आहे. त्यामुळे मी वाढदिवसाचे निमित्ताने हार तुरे सत्कार असे काहीही स्वीकारणार नाही. कार्यकर्त्यांनी कुठलाही बडेजाव करू नये तसेच वाढदिवशी भेटायला येण्याचे टाळावे. वाढदिवसाचे उत्सवी स्वरूप टाळून माझा मान राखावा असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# प्रकाश खळगे पिंपरखेड गावाचं रत्न!

**समारंभ** | पत्रकार, उपसरपंच अशोक निपटे यांचे प्रतिपादन

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांनी मागील ३० वर्षापासून स्वतः अत्यंत अडचणीच्या काळात शिक्षण पूर्ण केल्यानंतर इतरांना मदत करण्यासाठी स्वतःला झोकून दिल. त्यांनी स्वतःची परिस्थिती हलाखीची असतानाही लोकांना मदत करण्यासाठी कधीच हात आकडला नाही. लोकांसाठी अहोरात्र झगडणारे प्रकाश खळगे सर यांनी ज्ञानदानाचे पवित्र कार्य पिंपरखेड गावामध्ये सुरू केलं. वडवणी तालुक्यातील हजारो विद्यार्थ्यांना सन्मार्ग दाखवून त्यांनी स्वतःच्या पायावर उभे केल आहे. गावातील सामाजिक सलोखा अबाधित कसा राहील यासाठीही वेळोवेळी प्रयत्न केले. प्रत्येक कुटुंबाच्या सुखदुःखात धावून जाणारे प्रकाश खळगे सर यांना लोकांचे दुःख पाहवत नाही लोकांच्या वेदना दूर करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेण्याचं काम प्रकाश खळगे सर यांनी केलं असे खळगे सर म्हणजे पिंपरखेड गावाचं रत्नच आहेत असे गौरवोद्गार पिंपरखेड गावचे उपसरपंच पत्रकार अशोक निपटे यांनी काढले.



पिंपरखेड येथील छत्रपती शाहू महाराज वाचनालयाच्या वतीने काल ग्रंथ प्रदर्शन, गुणवंतांचा सत्कार, बक्षीस वितरण आणि वाचक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार तथा गावचे उपसरपंच अशोकराव निपटे यांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना पत्रकार अशोक निपटे बोलत होते. यावेळी पुढे बोलताना पत्रकार अशोकराव निपटे म्हणाले की, पिंपरखेड येथील रहिवासी असलेले लोकमान्य टिळक महाविद्यालयातील प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांनी मागील ३० वर्षापासून पिंपरखेड गावामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविलेले आहेत. छत्रपती शाहू महाराज वाचनालयाच्या माध्यमातून त्यांनी या गावांमध्ये अनेक सामाजिक सेवा उपलब्ध केलेल्या आहेत. त्यांनी निर्माण केलेल्या ज्ञान यज्ञाच्या माध्यमातून पिंपरखेड गाव प्रकाशमान झालेले आहे. गावातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानदानाचे काम चालू करून गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणे, त्याचबरोबर ग्रंथ वाचन, बक्षीस वितरण, ग्रंथ प्रदर्शन यासारख्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करून प्राध्यापक खळगे सर यांनी समाजाप्रती आपले उत्तरदायित्व निभावले आहे. पिंपरखेड सारख्या ग्रामीण भागात ज्यावेळी शिक्षणाची कोणतीही सुविधा उपलब्ध नव्हती त्याकाळी प्राध्यापक प्रकाश खळगे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करीत उच्च शिक्षण घेतलं. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत खराब असतानाही प्रकाश खळगे सर यांनी संघर्ष करत केवळ स्वतःच शिक्षण घेतले नाही तर गावातील इतर गरजूंना शिक्षण देण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली. त्यांच्या जीवनामध्ये अनेक संघर्ष आले. नोकरीला लागल्यानंतरही अनेक दिवस पगाराशिवाय काम करण्याची वेळ आल्यामुळे त्यांचे कुटुंब अडचणीत आलं होतं. तरीही त्यांनी धीर धरून काम केलं आणि समाजसेवा चालूच ठेवली. या काळात त्यांनी पिंपरखेड येथील विद्यार्थ्यांसाठी क्लासेस चालू केले. छत्रपती शाहू महाराज वाचनालयाची निर्मिती करून गावातील विद्यार्थ्यांसाठी विविध ज्ञानसंपन्न ग्रंथ उपलब्ध करून दिले. या ग्रंथ पुस्तकाचा उपयोग गावातील अनेक विद्यार्थ्याला होऊ लागला. त्यामुळे अनेक विद्यार्थी देखील प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांच्यामुळे घडले आहेत. या वाचनालयाच्या माध्यमातून अनेक वर्षापासून सामाजिक उपक्रम राबविले जातात. गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वितरणही केले जाते. शालेय मुलींसाठी त्यांनी गावात क्लासेस सुरू करून अनेक मुलींना शिक्षणाची दारे उघडी करून दिली. प्रकाश खळगे सर यांच्यामुळे अनेक मुली शिकल्या आणि आज त्या स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. असे गावासाठी आणि तालुक्यातील गरजू लोकांसाठी झगडणारे प्रकाश खळगे सर हे पिंपरखेड गावाचं रत्न असल्याचे गौरवोद्गार पत्रकार अशोक निपटे यांनी काढले. या कार्यक्रमासाठी या कार्यक्रमासाठी श्री. ज्ञानोबा शिंदे, दत्तगुरु बँकेचे अध्यक्ष गजानन निपटे, पत्रकार सतीश मुजमुले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्रकाश खळगे सर यांच्यासह या वाचनालयाच्या अध्यक्ष कु. विशाखा प्रकाश खळगे, ग्रंथपाल सौ. पल्लवी कोरडे, ग्रंथपाल सौ. शिलाताई उजगरे, प्रा. उदय खरात, मनोज खळगे, अग्नीताई खळगे, स्वप्नाली खळगे यांनी परिश्रम घेतले.

### सामाजिक कार्यातून पत्नीच्या स्मृतींना उजाळा

प्रा. प्रकाश खळगे सर यांच्या मागील २५ ३० वर्षाच्या सामाजिक कार्यामध्ये त्यांच्या पत्नी सौ. वंदना प्रकाश खळगे यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांनी आपल्या पतीला अडचणीच्या काळामध्ये खूप मोठा धीर दिला. त्यामुळे प्रकाश खळगे सर हे समाज कार्याला वेळ देऊ शकले. आणि कुटुंबातील संघर्षाचा काळ संपल्यानंतर वंदनाताई यांचे अकाली निधन झालं. त्यांच्या निधनामुळे प्रकाश खळगे सर हे पार खचून गेले होते. मात्र सामाजिक कार्याचा वसा आपण पुढे नेणे गरजेचे आहे याचं भान ठेवून त्यांनी आपल्या पत्नीच्या आठवणीला उजाळा देत सामाजिक कार्य चालूच ठेवले आहे. या कार्यक्रमांमध्ये बोलताना प्रा. प्रकाश खळगे सर यांनी आपल्या पत्नीच्या स्मृती माझ्यासाठी कायम राहतील आणि तिच्या प्रेरणेतून समाजकार्य चालूच राहील असे सांगितले.

---

# महाराष्ट्राच्या वाट्याला अर्थसंकल्पात काय?

**संतप्त :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे निदर्शने



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

केंद्रीय अर्थसंकल्प २०२४ मध्ये महाराष्ट्राला ठोस निधी तर नाहीच, पण इतर राज्यांच्या बरोबरीनेही काही देण्यात आले नसून लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातून भाजप सरकारला कमी जागा मिळाल्यामुळे महाराष्ट्रावर सूडभावनेतून झालेल्या अन्यायाचा निषेध व्यक्त करण्यासाठी बीड येथे बुधवारी (दि.२५) रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी निदर्शने केली.

मंगळवारी (दि.२४) रोजी केंद्र सरकारच्या वतीने संसदेत २०२४-२५ चा अर्थसंकल्प संसदेत सादर केला. परंतु या अर्थसंकल्पात महाराष्ट्र राज्याला काहीच मिळालेले नाही. केवळ महाराष्ट्राच्या तोंडाला पाने पुसल्याचा प्रकार केंद्रशासनाने केला आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातून भाजपला म्हणजेच एनडीए आघाडीला कमी जागा मिळाल्यामुळे त्याचे परिणाम महाराष्ट्राला भोगावे लागतील, अशा प्रकारची भाजपची सूडबुद्धीची घातक प्रवृत्ती या अर्थसंकल्पाच्या निमीत्ताने समोर आली आहे. परंतु महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील जनता स्वाभिमानी आहे. या प्रकारचा अन्याय महाराष्ट्र कदापी सहन करणार नाही. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात महाराष्ट्राला ठोस निधी तर सोडाच पण इतर राज्यांच्या बरोबरीनेही काही देण्यात आले असते, तरी समाधान वाटले असते. परंतु या अर्थसंकल्पात नेमका महाराष्ट्र कुठे आहे? महाराष्ट्र भारतात येतोच का नाही? असे प्रश्न महाराष्ट्रातील जनतेला पडलेला आहेत.

जनतेच्या भावना अतिशय तीव्र आहेत. जनतेच्या मनात असलेल्या याच भावना प्रकट करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी बुधवारी (दि.२४) रोजी सकाळी ११:०० वाजता बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात निदर्शने केली. यावेळी अर्थसंकल्पात एकच रोष, महाराष्ट्र दोष... महाराष्ट्र दोष! अशा घोषणा दिल्या आणि केंद्र सरकार आणि अर्थसंकल्पाच्या विरोधात निषेध व्यक्त केला.

# प्रवेश फॉर्म भरण्यास मुदतवाढ

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड बारावी सायन्स उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की,राज्य शासनाचे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी कृषि आणि संलग्न अभ्यासक्रमांचे प्रवेशासाठी २८ जुलैपर्यंत प्रवेश फॉर्म भरण्यास मुदतवाढ दिली असून,विद्यार्थ्यांना आदित्य फूड टेक्नॉलॉजी, कृषी अभियांत्रिकी जैवतंत्रज्ञान आणि कृषि महाविद्यालय बीड येथे प्रवेश घेण्याची संधी प्राप्त झाली असून,सर्व विद्यार्थ्यांनी तात्काळ ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरून घेणे ही विनंती.

सन्माननीय पालक आणि प्रिय विद्यार्थी आपणास नम्र निवेदन करण्यात येते की, कोणत्याही विद्यार्थ्याने इतर कोणत्याही अभ्यासक्रमाचा प्रवेश फॉर्म भरला असल्यास (उदा.मेडिकल, इंजिनियर,फार्मसी, नर्सिंग किंवा अन्य) तरीही या सर्व विद्यार्थ्यांनी या कृषि व संलग्न अभ्यासक्रमासाठी आदित्य बी.टेक.फूड टेक. कृषी जैवतंत्रज्ञान, कृषी अभियांत्रिकी आणि बी.एससी. एग्री हे उच्च तांत्रिक शिक्षण घेण्यास या महाविद्यालयात त्वरित फॉर्म भरून घेण्यास संपर्क करावा अशी माहिती महाविद्यालय चे प्राचार्य श्याम भूतडा यांनी दिली. आदित्य कृषी व संलग्न महाविद्यालयामध्ये नियमित विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासा सोबत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना कृषी संलग्नित विविध सरकारी व प्रायव्हेट सेक्टर मध्ये नोकरी मिळालेली आहे. तसेच महाविद्यालयाच्या संचालक मंडळांनी कृषी अभियांत्रिकी, अन्न तंत्र, जैवतंत्रज्ञान या व्यावसायिक शिक्षण सर्व प्रवर्गासाठी मोफत शिक्षण देण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांनी दिली आहे तरी सदरील संधीचा लाभ सर्वांनी घ्यावा.



**बीड :** वंचितच्या आरक्षण बचाव यात्रेला ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी संबोधित करुन महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना अभिवादन केले.

# शासकीय रोपवाटिकेस सदिच्छा भेट

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बुधवार रोजी अर्पिता ठूबे प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी,(खड) बीड यांनी बीड तालुका फळरोपवाटिका या प्रक्षेत्रावरील आंबा,चिकू, पेरू, डाळिंब, मोसंबी व लिंबोणी,आवळा,चिंच, बांबू इत्यादी फळपिकाच्या कीड व रोगमुक्त,जातीवंत व गुणवत्ता युक्त दरवर्षी कलमे व रोपे तयार केली जात असुन सर्व कलमे/रोपांची व मातृवृक्षांची त्यांनी पाहणी केली. त्यावेळी रोपवाटिकेवर करण्यात येणाऱ्या कामकाजा विषयी सविस्तर माहिती रोपवाटिका प्रमुख बाळासाहेब राठोड यांनी दिली. तसेच तालुका बीज गुणन केंद्र, बिंदुसरा,बीड प्रक्षेत्रावरील सोयाबीन या पिकाची पाहणी केली. यावेळी कृषी उप संचालक बाळासाहेब नितनवरे,तंत्र अधिकारी खेडकर, मगर , रोपवाटीका प्रमुख बाबासाहेब राठोड , व तालुका बीज गुणन केंद्र प्रमुख रेश्मा जाध, राऊत, नुमान व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



# व्यापारी महासंघाकडून सत्कार



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडचे नुतन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची बीड जिल्हा व्यापारी महासंघाच्या कार्यकारिणी सदस्यांनी भेट घेतली. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची बीड जिल्हा व्यापारी महासंघाच्या कार्यकारणी ने सदिच्छा भेट घेतली, व त्यांचे महासंघाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या वेळी व्यापार्यांच्या काही अडचणी असतील तर त्या सोडविण्यासाठी मी कायम शासन दरबारी तत्पर असेल व व्यापार्यांना प्रशासनाचे नेहमीच सहकार्य राहील असे त्यांनी सांगितले. यावेळी बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष भास्करराव जाधव, कार्याध्यक्ष अशोक शेटे, बीड शहराध्यक्ष प्रकाश कानगावकर, जिल्हा सचिव तुकाराम साळुंके , वाय.जनार्धन राव, जवाहरलाल कांकरिया, लईक अहमद, शांतीलाल पटेल, सुर्यकांत महाजन, सुदाम चव्हाण, सुशील खटोड इत्यादी व्यापारी बांधव उपस्थित होते.

---

**शेख शफीक** | जिल्हा प्रशासनास दिले मागण्यांचे निवेदन

# कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी मैदानात!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांपासून बीड जिल्ह्यातील बांधकाम कामगारांसह इतर कामगारांना शासनाकडून येणाऱ्या योजनेचा लाभ मिळणे बंद झाल्याने याबाबतची तक्रार अनेक कामगारांनी बांधकाम शहराध्यक्ष सय्यद बासेद यांच्या कडे केली होती. ही वस्तुस्थिती तात्काळ सय्यद बासेद यांनी ए आय एम आय एम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड शेख शफिक भाऊ यांच्याकडे मांडली असता भाऊ जातीने कामगारांच्या अडचणी सोडविण्याकरिता मैदानात उतरले असून त्यांनी तळक बांधकाम कामगार अधिकारी चव्हाण साहेब व मुंडे साहेब यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली .कार्यालय गाठत निवेदन देऊन कामगारांच्या अडचणी दूर कराव्यात असे सांगितले. बांधकाम कामगारांसह ईतर मजुरांची हेळसांड थांबवा अन्यथा एआयएमआयएम पक्ष लोकशाही मार्गाने आंदोलन आहे करेल.



याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, नवीन कामगारांची नोंदणी लवकरात लवकर करा. बांधकाम मजुरांना शासकीय योजना लवकरात लवकर मंजूर होत नाही व बांधकाम कामगारांचे रिन्यूअल देखील वेळेवर होत नाही. कामगारांच्या पत्नी तसेच महिला कामगारांना गरोदरपणात मिळणारे अनुदान, पुरुष व महिला कामगारांच्या मुलींच्या लग्नासाठी मिळणारे अनुदान, महिला व पुरुष कामगारांच्या शिक्षणासाठी मिळणारी शिष्यवृत्ती गेल्या अनेक महिन्यांपासून मिळालेली नाही. यामुळे बांधकाम कामगार मजुरांसह ईतर कामगारांना खूप मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या काही महिन्यापासून कामगारांसाठी असलेल्या योजनांचा लाभ कामगारांना मिळत नाही. तसेच कामगारांचे क्लेम चे पुराव्यात काही कागदपत्रे कमी पडल्यास कामगार कागदपत्र पडताळणीसाठी आल्यावर ते तुम्ही त्याच्याकडून घेऊन अपलोड करू शकतात. असे म्हणून अधिकारी हे काम पेंडिग मध्ये टाकतात. अशा प्रकारचा हलगर्जीपणा कामगारांच्या बाबतीत सहन करून घेतला जाणार नाही.

अशी तंबीही दिली. यावेळी युवक जिल्हाध्यक्ष शेख मतीन, शहराध्यक्ष शिवाजी भोसकर, जेष्ठ नेते सलाम सेठ, जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली लालु,शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, तालुका उपाध्यक्ष साजन चौधरी , युवक शहराध्यक्ष शेख सलमान, सोशल मिडिया जिल्हा अध्यक्ष सोहेल शिकलकर वार्ड अध्यक्ष शेख नेहाल, हबीब भाई आदी बांधकाम कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लव्हूरी केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील लव्हूरी केंद्राची केंद्रस्तीय बैठक माध्यमिक शाळा येवता येथे दुपारी १२:३०ते ०४: ३० वा. आयोजीत करण्यात आली बैठकीस प्रमुख मार्गदर्शन जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, सुनिलराव केंद्र यांनी लव्हूरी केंद्रातील जि.प.प्रा.४२ शाळेचे मुख्याधापक व १०४ शिक्षक बैठकीस उपस्थित होते. केंद्रे म्हणाले की विधार्थ्याची शैक्षणिक गुणत्ता वाढविण्याची सर्व शिक्षकांडून अपेक्षा केली शाळेत पूर्णवेळ उपस्थित राहावे शिक्षकांच्या आलेल्या किरकोळ रजा तात्काळ मान्य करून त्याची माहिती सादर करण्याची सुचना केंद्रीय मुख्याधापक केली, सर्व शिक्षकांची स्वतःउपस्थीती घेतली. मराठी,गणित व इग्रजी या विषयाची अध्यय निषपत्ती,शाळा व्यवस्थापन समिती व इत्यादी विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले,प्रस्थाविक केंद्रप्रमुख राधाकृष्ण कांबळे यांनी केले सुत्रसंचलन विक्रम डोईफडे यांनी केले.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा...
पुण्यभूमी

**सुविचार** - दुःखाचे ज्ञान होणे ही दुःखावर मात करण्याची पहिली महत्त्वाची पायरी असते.

# हमीभावाचे त्रांगडे कायम....!

लोकसभा निवडणुकीत दणका बसल्यानंतर शेतकऱ्यांचा रोष कमी करण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पातून केला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केल्या जात होती; परंतु त्या दृष्टीने कोणतीही ठोस घोषणा अर्थमंत्र्यांनी केली नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी किसान मजदूर मोर्चा आणि संयुक्त किसान मोर्चाचे निवडक नेते संसद परिसरात दाखल झाले, त्यांना विरोधी पक्षनेते राहुल गांधींची भेट घ्यायची होती; परंतु या शेतकरी नेत्यांना संसदेत प्रवेश करण्यापासून मज्जाव करण्यात आला. त्यानंतर राहुल गांधींनी या नेत्यांची भेट घेतली आणि किमान आधारभूत किमतीला कायदेशीर हमी देण्यासाठी सरकारवर दबाव आणण्याचे आश्वासन त्यांनी या नेत्यांना दिले. काँग्रेसने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात हमीभावाला कायदेशीर मान्यता देण्याचे आश्वासन दिले होते, कदाचित त्यामुळेच शेतकरी नेते या मुद्यावर चर्चा करण्यासाठी राहुल गांधींकडे आले असावेत. सध्या शेतकऱ्यांसाठी हमीभाव हा अगदी कळीचा मुद्दा झाला आहे, खरे तर तो आधीपासूनच आहे; परंतु मोदी सरकारच्या काळात आयात-निर्यातीसंदर्भात इतक्या वेळा आणि इतके उलटसुलट निर्णय घेण्यात आले की शेतकऱ्यांना पूर्वीपेक्षा खूप अधिक असुरक्षित वाटू लागले. त्यामुळेच हमीभावाची हमी देणारे कायदेशीर संरक्षण हा शेतकरी आंदोलनाचा एक महत्त्वाचा मुद्दा होता. आयातनिर्यातीसंदर्भात निर्णय घेताना सरकार सगळ्यात आधी शेतकरी नसलेल्या ग्राहकांचे हित पाहत असते. कांद्याचे दर वाढले आणि लोकांनी ओरड सुरू केली की लगेच कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली जाते. डाळी महागल्या आणि उत्पादक शेतकऱ्यांना चार पैसे अधिक मिळू लागले की लगेच विदेशातून मोठ्या प्रमाणात डाळी आयात करून डाळींचे भाव पाडले जातात. हे सतत होत असल्यामुळे उत्पादन कमी झाले किंवा जास्त झाले तरी दोन्ही परिस्थितीत मरण शेतकऱ्यांचेच होते. त्यामुळेच शेतकरी आपल्या मालाला निश्चित भावाची हमी मिळावी आणि या हमीभावाने सरकार शेतकऱ्यांचे सगळे उत्पादन खरेदी करेल याची हमी देणारे कायदेशीर कवच हमीभावाला मिळावे, या मागण्या सातत्याने लावून धरीत आहेत. याच काही प्रमुख मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी थेट दिल्लीवर स्वारी करीत मागच्या कार्यकाळात मोदी सरकारला वादग्रस्त कायदे मागे घेण्यास भाग पाडले होते. आंतरराष्ट्रीय बाजारात एखाद्या उत्पादनाची मागणी वाढली की निर्यातीतून चांगले उत्पन्न मिळण्याची संधी शेतकऱ्यांना लाभते; परंतु देशांतर्गत बाजारात त्या शेतमालाची टंचाई निर्माण होईल हे कारण पुढे करीत सरकार निर्यातबंदी लादते. सरकारचा हा हस्तक्षेप शेतकऱ्यांसाठी गळफास ठरू पाहत आहे. वास्तविक मोदी सरकार पहिल्यांदा सत्तेवर आले तेव्हा त्या सरकारकडून खुल्या बाजारात हस्तक्षेप केला जाणार नाही, अशीच अपेक्षा व्यक्त केली जात होती; परंतु तसे झाले नाही. निर्यातबंदीचा या सरकारने गेल्या दहा वर्षात इतका मुबलक आणि निष्ठूर वापर केला की केवळ कांदा उत्पादकच नव्हे तर अन्य अनेक पिकांचे उत्पादन करणारे शेतकरीही रडवेले झाले. त्यांच्या या नाराजीचा फटका यावेळी मोदी सरकारला निवडणुकीत बसला, त्यामुळे किमान यावेळी तरी शेतकऱ्यांची योग्य दखल हे सरकार घेईल असे वाटत होते, दुर्दैवाने त्याबाबतीत शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच पडली. शेतीमालाची खरेदी हमीभावाने करण्यासाठी सरकार मोठी आर्थिक तरतूद करेल अशी अपेक्षा होती; परंतु अर्थमंत्र्यांच्या भाषणात त्याबाबतीत साधा उल्लेखही नव्हता. डाळी आणि तेलबियांची हमीभावाने खरेदी करण्यासाठी 'जीपीएम आशा' ही योजना कार्यान्वयित करण्यात आली आहे; परंतु या खरेदीसाठी उपलब्ध करण्यात आलेला निधी पुरेसा नाही. त्यामुळे सगळ्याच उत्पादनाची खरेदी होण्याची शाश्वती देता येत नाही. अर्थमंत्र्यांनी भरड धान्याला महत्त्व देताना भरड धान्याच्या ३२ पिकांच्या सुमारे १०० वाणांची निर्मिती करण्याची घोषणा केली, घोषणा स्वागतार्ह असली तरी हे उद्दिष्ट गाठले जाईल का, हा प्रश्न आहेच. अशा अनेक घोषणा पूर्वीदेखील करण्यात आल्या आहेत. पुढे काही महिन्यातच त्या विस्मृतीत गेल्याचे दिसून आले. नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यात येईल, असे अर्थमंत्री आपल्या भाषणात म्हणाल्या; परंतु नैसर्गिक शेती करायची तर उत्पादन कमी होण्याची भीती आहे, अर्थात उत्पादन खर्च कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांना ते परवडू शकते; परंतु उत्पादन कमी झाल्यावर त्या उत्पादनाच्या किमती वाढतील, त्या किमतीत उत्पादने खरेदी केली जातील याची हमी कोण देणार? शेवटी सगळे गाडे अडते ते हमीपाशीच, सुरक्षेपाशीच. आमच्यावर आत्महत्या करण्याची वेळ येणार नाही, याची हमी सरकारने द्यावी, देशातला कुणी उपाशी झोपणार नाही, याची हमी आम्ही देतो, हेच तर शेतकऱ्यांचे म्हणणे आहे; परंतु सरकारच्या कानापर्यंत अजून ते गेले नाही, असे दिसते.

# शापित चळवळ....!

महाराष्ट्रात एकेकाळी शेतकरी कामगार पक्षाची चांगली ताकद होती, विधानसभेतला हा प्रमुख विरोधी पक्ष होता आणि या पक्षाच्या आमदारांनी केवळ सभागृहच नव्हे तर सभागृहाच्या बाहेरही आपली छाप निर्माण केली होती; परंतु हा भूतकाळ झाला. आता शेतकरी कामगार पक्षाचे आमदार मोजण्यासाठी एका हाताची बोटेदेखील अधिक ठरतील. या पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांना नुकताच विधानपरिषद निवडणुकीत पराभव स्वीकारावा लागला. त्यांच्याच पक्षाच्या एका आमदाराने त्यांना मत दिली नसावी, अशी चर्चा आहे. आता शेकाप कोकणातील एक-दोन जिल्हे किंवा काही तालुक्यांपुरता मर्यादित झाला आहे आणि ज्या पद्धतीचे राजकारण सुरू आहे ते पाहता निकट भविष्यातच या पक्षाच्या कार्यालयावर एखाद्या बड्या पक्षाचा झेंडा फडकताना दिसू शकतो. शेतकरी, कामगार, दलित या वर्गातील असंख्य चळवळी या महाराष्ट्राने पाहिल्या. या तिन्ही वर्गाची ताकद या राज्याने पाहिली. या चळवळींच्या जोरावर नेत्यांचे मोठे होणे आणि त्यानंतर तितक्याच वेगाने चळवळीचा ऱ्हास होतानाही महाराष्ट्राने पाहिला आहे. एकेकाळी शेतकरी संघटना ही महाराष्ट्रातील खूप मोठी बिगर राजकीय ताकद होती. शेतकरी संघटनेचा बिल्ला छातीवर लावल्यानंतर शेतकऱ्यांच्या पोरांमध्ये जणू काही दहा हत्तीचे बळ संचारायचे. या शेतकरी पोरांनी कोणे एकेकाळी महाराष्ट्र हादरवून टाकला होता; परंतु संघटनेच्या नेत्यांना राजकीय पदांचे आकर्षण निर्माण झाले आणि बघता बघता शेतकरी संघटना तुकड्या तुकड्यात विभाजित होऊन पार संपली असेच म्हणावे लागेल. आज या संघटनेचे नाव तेवढे जिवंत आहे; परंतु संघटनेची ताकद तडजोडीच्या राजकारणाने केव्हाच संपुष्टात आली. राजू शेट्टींनी उभी केलेली स्वाभिमानी शेतकरी संघटना काही काळ चांगला प्रभाव राखून होती; परंतु संघटना राजकारणात आली आणि संघटनेत राजकारण घुसले, परिणामी राजू शेट्टींचे खंदे धुरकरी सदाभाऊ भाजपात गेले, दुसरा तरणाबांड नेता, कार्यकर्ता रविकांत तुपकर राजू शेट्टींच्या राजकारणाला कंटाळून बाहेर पडला. स्वतः राजू शेट्टीदेखील लोकसभा निवडणूक हरले. आता महाराष्ट्रात कामगारांची, शेतकऱ्यांची आणि दलितांची मजबूत अशी एकही संघटना नाही. सगळेच तुकड्यातुकड्यात विभागून शक्तिहीन होत गेले, महाराष्ट्रात या चळवळींना हा शाप त्यांच्या जन्मापासूनच छळत आला आहे.

## अर्थकारण

# आर्थिक साक्षरता महत्त्वाची!

उल्हास दिगंबर गंगणे
9689055621

आजच्या व्यावहारिक जीवनात पैसा हा अतिशय महत्त्वाच्या स्थानावर आहे. पैशाशिवाय जीवनाची कल्पना करणे आजच्या परिस्थितीत जणू अशक्यच आहे. गुंतवणुकीचे निर्णय, नफा मिळविणे, संपत्तीची निर्मिती, पैशांचे व्यवस्थापन इत्यादी गुंतागुंतीच्या विषयांच्या सुलभीकरणासाठी प्रभावी उपाययोजना असणे, ही काळाची गरज आहे. हे सर्व गुंतागुंतीचे वाटणारे मुद्दे सुलभ करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लोकांमध्ये 'आर्थिक साक्षरता' (Financial Literacy) रुजविणे नितांत गरजेचे आहे. शालेय स्तरावर शिक्षणाच्या सुरुवातीच्या टप्प्यावर 'आर्थिक शिक्षणाचा' समावेश केल्यास तरुण पिढीमध्ये 'पैसा आणि पैशाच्या गोष्टी' शिकण्यासाठी जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल. त्यामुळे तरुणांमध्ये बचत आणि गुंतवणुकीच्या सवयीही रुजवण्यासाठी मदत होईल. अशाप्रकारे प्रत्येकजण आपापल्या संबंधित जीवनात आर्थिक दृष्टी (Financial Vision), आर्थिक बुद्धिमत्ता (Financial Intelligence) आणि आर्थिक शहाणपण (Financial Wisdom) आचरणात आणू शकेल.

आपण जो पैसा कमावतो तो नेहमीच आपल्या सततच्या परिश्रमाचा, ज्ञानाचा आणि बुद्धिमत्तेचा मिळालेला मोबदला असतो. जसे आपण बदल्यात काहीही न प्राप्त करण्यासाठी पैसे देत नाही; अगदी त्याचप्रमाणे, आपल्याला काहीही न करता मोबदला म्हणून पैसा मिळत नाही. मजुरी, पगार, मानधन अथवा आपल्या जवळील वस्तूची विक्री, मालमत्तेची विक्री किंवा इतर मौल्यवान वस्तूंच्या विक्रीच्या माध्यमातून आपणास पैसा मिळू शकतो. आपण वाचवलेल्या आणि गुंतवलेल्या पैशावरील व्याज आणि लाभांश म्हणून पैशाच्या स्वरूपात परतावा मिळतो.

'आर्थिक साक्षरतेला' (Financial Literacy) क्रमप्राप्त असे महत्त्व आहे. जसे म्हणतात ना, 'बचत केलेला पैसा हा कमावलेला पैसा असतो.' (Money saved is Money earne.) बचतीची सवय अंगी बाळगणे ही काळाची गरज आहे. आर्थिक साक्षरता (Financial Literacy) हे आर्थिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी एक अत्यंत महत्त्वाचे असे माध्यम आहे.

त्याचप्रमाणे जेव्हा आपण वस्तू आणि सेवा खरेदीसाठी किंवा मालमत्ता खरेदीसाठी पैशाचा वापर करतो, तेव्हा पैसा आपल्यापासून वेगळा होतो. अशा प्रकारे पैशाची आवक- जावक प्रवाहित होत असते. खर्च करताना पैसे बिनदिक्कतपणे खर्च केले जातात आणि पैसे कमविणे तितकेच कठीण असते; पैशाची अशी ही उपरोधिक पण स्वाभाविक प्रवृत्ती. गुंतवणुकीच्या पर्यायांचा शोध घेणे आणि पैसे योग्य ठिकाणी ठेवण्यासाठी आणि गुंतवलेल्या पैशावर जास्तीत जास्त परतावा मिळविण्यासाठी गुंतवणूक पर्यायांचा शोध घेऊन योग्य गुंतवणूक पर्याय निवडणे, यासाठी 'गुंतवणूक ज्ञान' (Investment Knowledge) योग्य गुंतवणूक पर्याय निवडण्यासाठी वापरले जाणे आवश्यक असते. 'इझी मनी' (Easy Money) सारखी कोणतीही संकल्पना जगात अस्तित्वात नाही, कारण पैसा हा नेहमी 'कष्टाने कमावलेला' (Hard Earned) असतो; आपल्या अखंड परिश्रम, चिकाटीचे प्रयत्न, ज्ञान, बुद्धिमत्ता आणि शहाणपणाचे ते मूल्य असते.

सोप्या भाषेत सांगायचे तर, आधुनिक काळातील देवाण- घेवाणीचे माध्यम म्हणजे पैसा, प्राचीन काळी वापरल्या जाणाऱ्या पारंपरिक वस्तुविनिमय पद्धतीची जागा घेणारे पैसा हे क्रांतिकारी साधन. माझ्याकडे व्यापारासाठी वस्तू किंवा देण्यासाठी सेवा आहेत, ज्यासाठी मला पैशाच्या स्वरूपात मूल्य प्राप्त होईल आणि हेच मला पैशाच्या स्वरूपात प्राप्त झालेले साधन त्यानंतर, मला स्वउपयोगासाठी खरेदी करायच्या वस्तू आणि सेवांवर खर्च करावे लागणार आहे. अशा प्रकारे 'मनी सायकल किंवा कन्सम्शन सायकल' कार्य करत असते. शिवाय, माझ्या क्रेडिट योग्यतेवर आणि ते परतफेड करण्याच्या सोल्व्हेंसीवर आधारित माझ्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी मला कर्ज आणि कर्जाच्या स्वरूपात पैसे मिळू शकतात. अशा प्रकारे वित्त प्रसारित होणे अपेक्षित असते. पैशाची आवक आणि जावक व्यवस्था याला अधिकृतपणे 'आर्थिक व्यवस्थापन' असे म्हणतात. बँकांमध्ये जमा केलेला पैसा किंवा शेअर बाजार, म्युच्युअल फंड किंवा इतर फायदेशीर गुंतवणूक पर्याय यांसारख्या क्षेत्रांमध्ये गुंतवलेले पैसे ज्यातून चांगला परतावा मिळू शकतो, तोही शेवटी अर्थव्यवस्थेत परत येतो. अशाप्रकारे 'आर्थिक चक्र' (Financial Cycle) चालत असते. 'पैशाचे चक्र'(Money Cycle) ही निरंतर प्रक्रिया आहे ज्यामध्ये कमाई, खर्च, बचत, गुंतवणूक, कर्ज घेणे आणि कर्जाची परतफेड करणे, या सर्व गोष्टींचा समावेश होतो.

अशा प्रकारे व्यावहारिकदृष्ट्या, जीवनाच्या केंद्रस्थानी वित्त म्हणजे पैसा आहे, बाकी सर्व जणू काही त्याच्याभोवती सेट झालेले आहे, असे भासते आणि वित्त हे जवळजवळ प्रत्येक गोष्टीचे समाधान आहे. अशाप्रकारे जीवनात वित्तीय सुरक्षा असण्याकडे लक्ष केंद्रित करणे आणि जीवनात वित्तीय बचतीस आणि वित्तीय संकलनास प्राधान्य देणे हे जीवन अखंडपणे चालवण्यासाठी नितांत गरजेचे आहे. घर सांभाळण्यासाठी लागणारा पैसा असो, शैक्षणिक गरजा पूर्ण करणे असो, जीवनातील अप्रिय घटनांना तोंड देण्याची तयारी असो; पैसा हा जीवनाच्या केंद्रस्थानी असतो आणि तो नेहमी तिथेच राहणार. प्रेम एखाद्याचे भावनिक आधार बनू शकते, ते जीवनदेखील सावरू शकते; परंतु कुटुंब चालविण्यासाठी, जीवनातील मजेशीर क्षणांचा



आनंद घेण्यासाठी आणि भविष्यातील कठीण प्रसंगांना तोंड देण्यासाठी पैसा आवश्यक असतोच. पैसा कदाचित आनंद विकत घेऊ शकत नाही; परंतु त्यामुळे आनंद द्विगुणित करण्याचा मार्ग मात्र दिसतो. वित्त किंवा अर्थ हा पर्याय नसून प्राधान्य आहे जे जीवनात अनेक पर्यायांचे दरवाजे उघडते.

त्यामुळे गरजा आणि इच्छा यातील फरक समजून घेण्यासाठी, अनावश्यक गोष्टींवर पैसे खर्च करण्यापासून स्वतःला आवर घालण्यासाठी, सुरुवातीपासूनच पैशांची बचत आणि योग्य ठिकाणी गुंतवणूक करण्याची सवय लावण्यासाठी, सुरक्षित राहण्यासाठी आयुष्याच्या सुरुवातीच्या टप्प्यावरच विमा पॉलिसी घेणे, तुमचे जीवन अप्रिय घटनांपासून आर्थिकदृष्ट्या सुरक्षित करण्यासाठी आणि जोखीम व्यवस्थापनाचा उपाय म्हणून विमा काढणे. जीवनात असे निर्णय घेणे जे 'आर्थिक शहाणपणा'च्या (Financial Wisdom) दृष्टीकोनातून उचित असतील; या सर्वांकरिता 'आर्थिक साक्षरतेला' (Financial Literacy) क्रमप्राप्त असे महत्त्व आहे. जसे म्हणतात ना, 'बचत केलेला पैसा हा कमावलेला पैसा असतो.' (Money saved is Money earned.) बचतीची सवय अंगी बाळगणे ही काळाची गरज आहे. आर्थिक साक्षरता (Financial Literacy) हे आर्थिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी एक अत्यंत महत्त्वाचे असे माध्यम आहे.

(लेखक कर सल्लागार आहेत.)
मंगळवारी पेठ, उमरेड, जि. नागपूर.

## दृष्टिक्षेप

# ना 'बहीण', ना 'भाऊ', केवळ मतदान 'लाडके'!



लोकनाथ काळमेघ
9096494894

'लाडली बहना', 'लाडकी बहीण', अशा योजना काही राज्य सरकारांनी सुरू केल्या आहेत. महाराष्ट्र सरकारने 'लाडकी बहीण' नंतर नुकतीच 'लाडका भाऊ'चीही घोषणा केली आहे. 'लाडकी बहीण' या योजनेत महिलांना दरमहा १५०० रुपये देण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक महिनाभरावर येऊन पोहचली आहे. केंद्रात व राज्यातही सत्ताधारी असलेल्या भाजपप्रणित युतीला लोकसभा निवडणुकीत चांगलाच फटका बसला आहे. केंद्रात भाजपला यावेळी साधे बहुमतही मिळालेले नाही. हे लक्षात घेऊन मतदारांना 'खिरापती' वाटायच्या, म्हणजे मते मिळतील, यासाठी हा लोकानुनयी खटाटोप राज्य सरकार करत आहे; मात्र विधानसभा निवडणुकीत अपयश आले किंवा केंद्रासारखी स्थिती उद्‌भवली तर, या योजनांचे काय होईल? त्यामुळे या योजनांबाबतची राज्य सरकारची तत्परता संशयास्पद आहे, कारण त्यामागच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका आहे.

सत्ताधाऱ्यांनी सरकारी पैशाच्या जोरावर असले 'खेळ' करणे देशासाठी नुकसानकारक आहे. केंद्र सरकारने मुख्यतः देशाचे रक्षण, परराष्ट्र संबंध, दळणवळणाच्या सोयी, चलन व बँकिंग हे नीट करावे आणि राज्य सरकाराने अंतर्गत शांतता-सुव्यवस्था म्हणजे पोलीस व तुरुंग, तसेच शेतजमिनीतील हक्क संबंधाचे दप्तर नीट ठेवावे. सर्व नागरिकांना पेयजल आणि सार्वजनिक स्वच्छतेच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. शिक्षण व आरोग्य या सेवा मोफत पुरवाव्यात. त्यातून सशक्त व प्रशिक्षित श्रमिक उपलब्ध होतील. म्हणजे शेती उद्योग आदी व्यवसायांच्या विकासाला मदत होईल.

सरकारला उत्पन्न मुख्यतः कर उभारणीतून मिळत असते. नागरिकांना झेपेल एवढ्या प्रमाणातच कर आकारणी करावी लागते. आधीच केंद्र व राज्य सरकारांवरील कर्जाचे डोंगर खूप वाढले आहेत. ते वाजवीपेक्षा जास्त वाढवले, तर कमी उत्पन्नवाल्यांचे शोषण वाढत जाते.

सर्वसाधारण राज्यकारभार किंवा प्रशासन वरील पद्धतीने चांगले चालवले, तर उपक्रमशील लोकांना वेगवेगळे व्यवसाय करणे सोपे जाते. त्यामुळे सगळ्या समाजाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते.

समाजातील बहुतेक स्त्री-पुरुष आर्थिकदृष्ट्या सबळ असले म्हणजे त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे कामधंदे करून उपजीविकेसाठी आवश्यक तेवढे उत्पन्न कमवता येते. त्यांनी आपल्या उपजीविकेसाठी आवश्यक असलेले उत्पन्न स्वतः मिळवणे, ही आदर्श व्यवस्था मानली पाहिजे. त्यासाठी उद्योगधंदे नीट करता यावेत, या दृष्टीने आवश्यक त्या सोयी सरकारने टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून द्याव्यात. यालाच 'विकास कार्यक्रम' म्हणतात.

लोकांना उपजीविकेसाठी सरकारने प्रत्यक्ष मदत करणे, हे अयोग्य आहे. गेल्या काही वर्षांचा अनुभव पाहता ज्यांचे उत्पन्न बेतासबात आहे, अशा कुटुंबांतल्या मुला-मुलींना चांगले दर्जेदार शिक्षण मिळेल, अशी व्यवस्था करणे हे श्रेयस्कर ठरते. त्याशिवाय अन्नधान्य व तत्सम जीवनोपयोगी वस्तू परवडणाऱ्या भावात मिळत राहतील, अशी व्यवस्था चालवणे हेही दुसऱ्या महायुद्धापासून बऱ्याच देशांनी स्वीकारले आहे. या पलीकडे कुणालाही उपजीविकेसाठी सरकारने पैसा उचलून देणे, हे अयोग्यच नव्हे, तर हानीकारक ठरणारे आहे.

'आयते' खायला मिळते, मग कशाला कष्ट करायचे, अशी भावना लोकांत वाढणे धोक्याचे आहे. आपल्या उपजीविकेला आवश्यक तेवढे आपण कमावलेच पाहिजे, हा सर्वसाधारण दंडक असला पाहिजे. या दृष्टीने पाहता 'लाडकी बहीण'सारख्या योजना पूर्णतया चुकीच्या ठरतात. प्रत्येक स्त्री-पुरुषाने आपले आरोग्य चांगले ठेवावे आणि समाजाला उपयोगी पडणारे उत्पादक काम मनापासून करायला हवे. 'लाडकी बहीण' या योजनेत त्या बाईला विशेष काही अडचण आहे, अशी अट घातलेली दिसत नाही. सुदृढ असणाऱ्या महिलांना दरमहा सरकारने फुकटचा पैसा कशासाठी द्यायचा?

'आपल्या घरातल्या महिलांना दरमहा १५०० रुपये मिळणार आहेत. मग कशाला विरोध करा?' असे बहुतेक जण मानतात; पण असा संकुचित विचार करून चालणार नाही. समाजाचा सगळा कारभार नीट चालावा, यासाठी जी पथ्ये पाळणे आवश्यक आहे, ती पाळणे, हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, अशी भावना जोपासली पाहिजे. सत्ताधाऱ्यांनी सरकारी पैशाच्या जोरावर 'लाडली बहना', 'लाडकी बहीण' असले 'खेळ' करणे देशासाठी नुकसानकारकच आहे..वास्तविक राजकीय पक्षांना ना 'बहीण', ना 'भाऊ', केवळ मते 'लाडकी' असतात, यात कुणाचे दुमत असेल तर सांगावे.

## देवाचिये द्वारी

# कशाला पाहिजे गुरू- बिरू....?



नरेंद्र नाशिरकर
9850352130
साई कथाकार-प्रबोधनकार, नागपूर

जीवनात खरंच गुरूची आवश्यकता आहे काय? गुरूमध्ये शिष्याच्या जीवनात बदल घडविण्याची शक्ती असते काय? या प्रश्नाचे उत्तर इतिहासात आहे. धन, संपत्ती लोभाच्या मागे लागून वाटमारी करताना हत्या करून त्याच्या बोटांची माळा गळ्यात टाकणाऱ्या अंगुलीमालाच्या जीवनात तथागत गौतम बुद्धांच्या मार्गदर्शनाने आलेले परिवर्तन गुरूशक्तीची साक्ष देते. किंवा सत्युगात देवर्षी नारदांमुळे वाल्याचे महर्षी वाल्मिकीमध्ये झालेले रूपांतर हे गुरूशक्तीची जाणीव करून देण्यास पुरेसे आहे.

संत तुकाराम महाराज, मातोश्री जिजाऊ... या गुरूशक्तीमुळे विपरित परिस्थितीत छत्रपती शिवराय स्वराज्य स्थापन करू शकले.

अलीकडच्या काळातील ही घटना.. सन १९७४ मध्ये आर्थिक तंगीने शिक्षण सोडलेले स्टीव्ह जॉब्स भारतात येऊन निम करोली बाबांना नतमस्तक होतात. 'अंतर्ज्ञान ही माझ्या मते, बुद्धीपेक्षा अधिक शक्तिशाली गोष्ट आहे. त्याचा माझ्या कामावर मोठा परिणाम झाला,' असे ते म्हणतात. ते पुढे ॲपल कंपनी स्थापन करतात आणि जगात यशस्वी उद्योगपती म्हणून उदयास येतात. अशाप्रकारे ॲपलची सुरुवात भारताशी निगडीत आहे, असे अनेक व्यक्ती मानतात.

मग आजच्या युगात असे घडताना का आढळत नाही? यात दोष शिष्याचा आहे, कारण गुरूभक्तीच्या पहिल्या परीक्षेतच शिष्य अनुत्तीर्ण होतात. ही भक्तीची पहिली पायरी म्हणजे श्रवण भक्ती! ऐकणे! हा गुणच दुर्मिळ होत चालला. दुसरे म्हणजे समर्पण, विश्वास!

(या ठिकाणी आजकालच्या काळात चांगला गुरू लाभणे, ही गोष्टही विचारात घेण्यासारखी आहेच. हे लक्षात घ्यावे लागेल.)

आजपासून ५० वर्षांपूर्वीचे बालपण आठवा! त्याकाळी एकदाचे मुलाचे नाव शाळेत टाकले, की आई- वडील सर्वस्वी शिक्षकावर विश्वास ठेवायचे. आणि शिक्षकाने कधी विद्यार्थ्याच्या काही चुकी निमित्ताने त्याला चोप दिला आणि मुलाने घरी तक्रार केली, तरी आई- वडील कधी शिक्षकांकडे विचारायला येत नव्हते, उलट मुलालाच समज द्यायचे! छडी लागे छम छम...ही म्हण अस्तित्वात होती. म्हणूनच त्याकाळी विद्यार्थी आपल्या जीवनात काहीतरी प्राप्त करू शकले.

पण आज चित्र बदलले! छडी मारणे दूर, मुलांना दमदाटी करण्याचा अधिकारही शिक्षकांना पालकांनी दिला नाही. हा अविश्वास पुढे घातक ठरत गेला. अगोदर आई- वडील खूप विचार करून शाळेची निवड करतात. शालेय शिक्षण सुरू होते. वर्गशिक्षक शिकवितात; पण वर्ग शिक्षकावर आई- वडील अविश्वास दाखवितात. यामुळे बाहेर कोचिंग, ट्युशन क्लास लावतात. नंतर या ट्यूशन क्लासवरसुद्धा अविश्वास दाखवतात. परत मुलाला क्रॅश कोर्सेस करायला लावतात. शेवटी अविश्वासात मुलगा जगतो. आज विश्वासाच्या जागी अविश्वास आहे, समर्पण तर फारच लांब! यामुळे विद्यार्थी आणि त्यांचे आई- वडील गोंधळलेले दिसतात; परंतु जीवनात हरवलेला विश्वास जागवणाराच खरा गुरू असतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ओळी आजच्या परिस्थितीला लागू पडतात.

'लाखो गुरू है जगत मे, पर एक भी नही काम का।
सब स्वार्थ के है आसरे, डंका बजाते नाम का।।
'विश्वास' ही एक गुरू है, बाकी सभी को जाने दे।
जो खास की पहचान दे, ऐसे गुरू पर जान दे।।'

ज्ञान देणे आणि ज्ञान मिळविण्याची पात्रता देणे, सत्य दाखविणे आणि सत्य शोधण्याची पात्रता निर्माण करणे यामध्ये फार मोठा फरक आहे. खरे गुरू तुम्हाला ज्ञान देतच नाही, ते तुमच्यातील उणिवा दाखवितात व पात्रता वाढवितात. यामध्ये सर्वात मोठी बाधा...अहंकार आणि ईर्षा! हे दोन 'इन्फेक्शन' कमी झाले की ऐकून घेण्याची, समजून घेण्याची, इतरांशी तुलना न करता ज्ञान मिळविण्याची प्रक्रिया सुरू होते. दुसऱ्यांनी केलेली टीका, दाखविलेली उणीव, मग मार्गदर्शन वाटायला लागते. प्रत्येक क्षणी, प्रत्येक प्रसंग, प्रत्येक गोष्ट, प्रत्येक घटना, प्रत्येक व्यक्तीकडे शिकण्याच्या दृष्टीने तो बघायला लागतो. पुढे हळूहळू दृष्टीकोन बदलतो. येथूनच त्याला चराचरांत व्याप्त गुरूतत्त्वाचे दर्शन व्हायला सुरुवात होते. तुम्ही मिसाईल आहात; पण लक्ष्य चुकू शकेल. जीवनात गुरू लाभला, की तुम्ही गाईडेड मिसाईल बनाल. मग लक्ष्य प्राप्तीपासून तुम्हास कुणीही रोखू शकणार नाही.

*(क्रमशः)*

## वाचक विचार मंच

### अर्थसंकल्पाचा राजकीय फायद्यासाठी वापर

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत नुकताच देशाचा सन २०२४/२५ करिता अर्थसंकल्प जाहीर केला असला, तरी प्रामुख्याने देशामध्ये महागाईचा आगडोंब उसळलेला आहे, त्यावर काही उपाययोजना केलेल्या दिसून आलेल्या नाहीत. शेतकरी वर्गासाठी पीएम किसान सन्मान निधी, किमान हमी भावाच्या रकमेत वाढ करण्याबाबत कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. आपले राजकारण सावरण्यासाठी एनडीए सरकारमधील घटक पक्ष असलेल्या नितीशकुमार यांचा जनता दल युनायटेड आणि चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगु देसम पार्टी या पक्षांच्या पाठिंब्यावर सरकार तरले असल्याने यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात बिहार व आंध्र प्रदेशवर योजना व निधीची खैरात करण्यात आली आहे. अनुक्रमे बिहारसाठी ५८९०० कोटींच्या योजना, तर आंध्र प्रदेशकरिता १५००० कोटींचा निधी, योजना भरभरून दिल्याने यावरून देशाच्या मध्यवर्ती सरकारचा हेतू स्पष्ट होतो आहे. या उलट देशाची आर्थिक राजधानी महाराष्ट्राला, कर्नाटकला काहीही मोठी घोषणा केलेली नाही. या राज्यांतून मोठ्या प्रमाणात टॅक्स केंद्रीय सरकारला जमा होत असताना त्यांनाच विविध योजना आणि निधीतून बाहेरचा रस्ता दाखविण्यात आला आहे. त्यामुळे राजकीय फायद्यासाठी अर्थसंकल्पाचा वापर करण्यात आला आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही!

**राजू जाधव,**
मांगूर, जि. बेळगांव

### कमला हॅरिस अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष होण्याची शक्यता!

प्रकृतीच्या कारणास्तव अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी माघार घेतली असून त्यांनी उपाध्यक्ष कमला हॅरिस यांचे नाव अध्यक्ष पदासाठी डेमोक्रॅटिक पक्षातर्फे पुढे केले आहे. कमला हॅरिस यांना अमेरिकेतील भारतीयांचे समर्थन मिळण्याची शक्यता आहे. कमला हॅरिस या निवडून आल्यास साहजिकच आपले अमेरिकेचे संबंध मजबूत होतील. आज अनेक देशांत भारतीय वंशाचे प्रमुख म्हणून अनेकजण यशस्वीपणे काम करीत आहेत. पहिल्या मतपत्रिकेवर डेमोक्रॅटिक पक्षाचे नामांकन जिंकण्यासाठी आवश्यक असलेल्या १,९७६ हून अधिक प्रतिनिधींचा पाठिंबा त्यांना मिळाला आहे. एकूणच एक महिला व भारतीय वंशाची कमला हॅरिस अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राची अध्यक्ष पदासाठी वाटचाल करीत आहे. ही घटना भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे, यात शंका नाही

**शांताराम वाघ**, पुणे,
मो. नं.: ९६२३४५२५५३

## धुमस

### चिंतन

खुद्द त्यांनीच त्यांच्याबद्दल
केलं होतं हे विधान
मी 'नॉनबायोलॉजीकल' आहे
असं म्हणायचे आमचे 'प्रधान'

ते 'चारशे' जागा म्हणायचे
पण भेटल्या 'दोनशे चाळीस'
अशा अवतारी पुरुषाचे
का स्वप्न मिळाले धुळीस?

'भागवत'कथा ऐकून
हळूच पुटपुटला 'चौकीदार'
'सुपरमॅन'ला कॉमनमॅन
करतो का त्याचा 'अहंकार'?

घमघमाट फोडणाऱ्या
पुडीचे फुटले शेवटी बिंग
आता फक्त कागद उरला
केव्हाचाच उडून गेला हिंग

'ना' म्हणजे आंध्र
'नि' म्हणजे बिहार
नावातील ह्या आद्याक्षरावर
अवलंबून आहे कारभार

'आय' म्हणे नका आता
भलत्या गोष्टी 'फेकू'
'नानी' आठवेल तुम्हाला
जर त्यांनी काढला टेकू


**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

## जगभ्रमंती

# चाकाशिवाय सुसाट वेगाने धावते 'ही' विदेशी ट्रेन

सोशल मीडियावर आपण नेहमीच जगातील अत्याधुनिक ट्रेन पाहत असतो. बुलेट ट्रेन तर हल्ली सगळ्यांच्याच परिचयाची झाली आहे; पण आज आम्ही तुम्हाला एका अशा भन्नाट ट्रेनबद्दल सांगणार आहोत ज्यात तुम्ही हजारो किलोमीटरचा प्रवास फक्त काही तासांत करू शकता. चला जाणून घेऊ या, या ट्रेनबद्दल..

एकेकाळी या ठिकाणाहून त्या ठिकाणापर्यंत जाण्याचा सोयीस्कर मार्ग म्हणजे ट्रेन, एवढीच काय ती ट्रेनची ओळख होती; पण आजच्या विकसित जगात, ट्रेन्ससुद्धा विकसित झाल्या आहेत. जेव्हा आपण ॲडव्हान्स आणि वेगवान ट्रेनबद्दल बोलतो तेव्हा आपसूकच आपल्या डोळ्यांसमोर येते ती जपानची बुलेट ट्रेन. ताशी ३२० किलोमीटरच्या वेगाने धावणारी ही ट्रेन नक्कीच एका आकर्षणाचा केंद्र बिंदू आहे. जगभरात आपल्या अत्याधुनिक रेल्वेचा डंका वाजवल्यानंतर, आज आम्ही तुम्हाला जपानमधील अशाच एका ट्रेनबद्दल सांगणार आहोत जी चक्क चाकांशिवाय चालते आणि हजारो किलोमीटरचा प्रवास काही तासांतच पूर्ण करते. चला पाहू यात, नेमके या ट्रेनचे नाव काय?



मॅग्लेव्ह ट्रेन, ज्याला मॅग्नेटिकली लेव्हिटेड ट्रेन म्हणूनही ओळखले जाते. ही एक हाय-टेक ट्रेन सिस्टीम आहे, जी ट्रेनला ट्रॅकच्या वर उचलण्यासाठी आणि ट्रेन चालवण्यासाठी चुंबकीय शक्ती वापरते. ही ट्रेन पाहणे खरोखरच आश्चर्यकारक आहे. या ट्रेनमध्ये एक हायटेक सिस्टिम वापरली गेली आहे, ज्यामुळे ही ट्रेन बुलेटच्या वेगाने धावते. मॅग्लेव्ह ट्रेन तुम्हाला ताशी ५०० किलोमीटरपेक्षा जास्त वेगाने पोहोचवू शकते, ज्यामुळे ही ट्रेन जगातील सर्वात वेगवान ट्रेनच्या यादीत आपले स्थान बनवते. चुंबकीय शक्तीमुळे, मॅग्लेव्ह गाड्या फार कमी घर्षण करत धावतात, ज्यामुळे तुमचा प्रवास हा अगदी शांततेत तसेच आरामदायी होतो. सध्या ही ट्रेन जपान, चीन आणि दक्षिण कोरियामध्ये कार्यरत आहे.

**महाराष्ट्रात मॅग्लेव्ह ट्रेन?:** भारत सरकारने मॅग्लेव्ह ट्रेन तंत्रज्ञानाबद्दल रस दाखवला आहे. याव्यतिरिक्त, भारत सरकारने २०१८ मध्ये मुंबई-पुणे मार्गावर मॅग्लेव्ह ट्रेनसाठी जपानसोबत सामंजस्य करारसुद्धा केला होता; परंतु अजूनही प्रकल्प त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात आहे आणि त्याला अनेक आव्हाने आहेत, जसे की अवाढव्य खर्च आणि भूसंपादन.

## गुल्लेर

# अदीक कसं पाह्यजे?



नरेंद्र इंगळे
9561226572

'ओ सरपंच.. नळाच्या ताल बसवाना आमचा.'

'काय झालं?'

'आठ- दहा दिवसापासून गढुय पानी येऊन राह्यलं. बायकोचं पोट बिघडलं.. लेकरं संडासले जाऊजाऊ बेजार झाले.'

'पाईपलाईन फुटली तिकडे.'

'त्याच्यावर इलाज करा.. दुरुस्ती करा लवकर.'

'वरते सात- आठ फोन केले. कोनी काही गोठ घेत नाही.'

'धळक मारा तथीसा.. मी येतो सोबत.. लेकरं दवाखान्यात भरती कराले लावता काय? मंग काय कामाचं तुमचं सरकार?'

'सरकार कामाचंच आहे. एकनाथभाऊ दिवसरात एक करुन राह्यले. तुमच्या घरचीले दीळ हजार रुपये मयना सुरू होईन. पोराले लाडका भाऊ.. पोरीले लाडकी बहीन.. फुकट भांडे भेटून राह्यले.'

'मले आजून वाटी भेटली नाही.'

'कधी अर्ज केला तुम्ही?'

'झाले पंधरा दिवस.'

'आठ दिवसात भांडे घरपोच येतीन..तुमच्या पोरीच्या लगनाले एक लाखाची मदत होईन..'

'पोरगी कोनाच्या पसंतच येत नाही. मायच्या वानावर गेली. पावने पाहून जातात अन् घरी गेल्यावर फोन करतो म्हनतात. एकाचा फोन आला नाही.'

'काहीच चिंता करू नका.. मी एकनाथ भाऊशी बोललो.. ते म्हनतात मी पोरगाही पाहून देतो.'

'काय बोलता? भाऊले इतकी फुरसद आहे काय?'

'भाऊच्या हाताखाली कर्मचारी आहेत. तुम्ही पोरीचा बायोडाटा सेतूत जमा करा.. तुमच्या मोबाईलवर पोराची लिस्ट येऊन जाईन.'

'लिस्ट येऊन काय करता? जवाई कामा- धंद्याचा असला पाह्यजे.'

'भाऊ फसोतीन काय तुमाले? तिकडे मुंबई- गुजरातले पोरी भेटत नाहीत. एखांदा कपड्याचा व्यापारी उचलून नेते तुमच्या पोरीले.. तोच सगळा खर्च करते. तुम्ही त्याले चड्डी घेऊ नका.'

'याच्या आगुदर असं झालं काय?'

'लय लोकाईनं गुजरातले पोरी पाठवल्या. पोरीच्या बदल्यात पैसेही घेतले. अदीक कसं सरकार पाह्यजे तुमाले?'

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी


# पिंपरी-चिंचवड आणि मावळात जोरदार पाऊस

## वृक्ष पडले, वाहनांचे नुकसान



देशोन्नती वृत्तसंकलन

**पिंपरी:** मावळ आणि पिंपरी-चिंचवड शहर परिसरामध्ये गेल्या २४ तासांपासून जोरदार पाऊस सुरूआहे. पवनेच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे बुधवारी अनेक ठिकाणी झाडे पडण्याच्या घटना घडलेल्या आहेत.

सकाळी सात ते दुपारी पावणेदोन या वेळेत आठ ठिकाणी झाड पडण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे वाहनाचे नुकसान आणि वाहतूककोंडी निर्माण झाली होती. तर एका ठिकाणी आगीची घटना घडली आहे. पिंपरी-चिंचवड तसेच मावळ परिसरामध्ये गेल्या २४ तासांपासून संततधार सुरू आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. लोणावळा परिसरात तर पावसाचा वेग अधिक आहे. तिथे २७५ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

# चांदोली धरणाजवळ सौम्य भूकंपाचा धक्का

## धरणाला कोणतीही हानी नाही

**सांगली :** चांदोली धरणाच्या परिसरात बुधवारी पहाटे भूकंपाचा सौम्य धक्का बसला. यामुळे धरणाला कोणतीही हानी झाली नसून धरण सुरक्षित असल्याचे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले.



बुधवारी(ता.२४) पहाटे ४.४६ वाजता भूकंपाचा धक्का जाणवला. वारणावती येथील भूकंप मापन केंद्रावर याची तीव्रता ३ रिश्टर नोंदली गेली असून यामुळे कोणतीही हानी झालेली नाही. भूकंपाचे केंद्र मापन केंद्रापासून आठ किलोमीटर होते. पावसाने विश्रांती घेतलेल्या काळात हा भूकंपाचा धक्का बसल्याने काही नागरिक घराबाहेर पडले होते.

धरण पाणलोट क्षेत्रासह तालुक्यात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. चांदोली धरणाचे दोन वक्राकार दरवाजे मंगळवारी एक मीटरने उचलत विसर्ग सुरू करण्यात आला. दरवाज्यांतून २२०० क्यूसेक व दोन विद्युत जनित्रमधून १६०० क्यूसेक, असा एकूण ३८०० क्यूसेक नदीपात्रात विसर्ग सुरू आहे. यामुळे नदीच्या पाणीपातळीत वाढ होत आहे.

वारणा नदीची पाणीपातळी वाढल्याने अजूनही कोकरूड-रेठरे बंधारा, मांगले-सावर्डे पूल, समतानगर पूल, येळापूर-वाकुर्डे पूल, कांदे मांगले, सावर्डे पुलावर पाणी आल्याने वाहतूक बंद केली आहे. पाडळेवाडी-निगडी फाटा रस्त्यावरील ओक्याच्या पुलावरून पाणी आल्याने काहीवेळ वाहतूक बंद केली होती. धरणाचे दरवाजे उघडल्यावर पाणीपातळीत वाढ होणार, यासाठी दक्षता म्हणून शित्तूर व सोंडोली पूल दोन तासांसाठी बंद ठेवला होता, चांदोली धरणात मंगळवारी सायंकाळी चार वाजता २९०९ टीएमसी एकूण तर २२.२१ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. धरण ८४.५९ टक्के भरले आहे. भणदूर सम्राट अशोकनगर दरम्यानचा फरशी पूल वाहून गेला आहे.

# मविआचे सरकार आल्यास शेतकरी कर्जमुक्त

## नाना पटोलेंचे आश्वासन

## शेतकरी करताहेत अस्मानी सुलतानी संकटाचा सामना



देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्याला अस्मानी सुलतानी संकटाचा सामना करावा लागत आहे. शेतमालाला भाव नाही, शेतीला लागणारे बी-बियाणे, खते व कृषी साहित्य प्रचंड महाग झालेली आहेत, कठीण परिस्थितीत जीवन जगत असलेल्या बळीराजाला आधार देणे सरकारचे कर्तव्यच आहे.

तेलंगणातील काँग्रेस सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली आहे. महायुती सरकारनेही संकटात सापडलेल्या बळीराजाला सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी मागणी करत महायुती सरकारने कर्जमाफी केली नाही तर सत्तेवर येताच महाविकास आघाडी सरकार शेतकऱ्याला कर्जमाफी देईल, असे आश्वासन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिले आहे. यासंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले की, राज्यात यावर्षी काही भागात कोरडा दुष्काळ तर काही भागात ओला दुष्काळ अशा परिस्थितीचा सामना शेतकऱ्याला करावा लागला. आताही काही भागात अतिवृष्टी झाली आहे तर काही भागात अजून पावसाची प्रतीक्षा आहे, काही भागात दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे. बोगस खते बी-बियाणांचा सुळसुळाट आहे, पण सरकार फक्त कारवाई करण्याच्या पोकळ घोषणा करते. पीकविम्याचा फायदाही शेतकऱ्याला मिळत नाही तर पीक विमा कंपन्यांनाच मोठा फायदा होतो. परिस्थितीने पिचलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या दिवसेंदिवस वाढत आहेत. मागील ६ महिन्यात राज्यात १७२७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, हे महाराष्ट्राला भूषणावह नाही. राज्यातील शेतकऱ्याची आताची परिस्थिती अत्यंत बिकट असून कर्जमाफी करण्याची गरज आहे.

महायुती सरकार केवळ लाडका बिल्डर, लाडका उद्योगपती यांच्यासाठीच काम करत आहे. उद्योगपती अनिल अंबानी यांचे १७०० कोटी रुपये माफ करण्यासाठी सरकारकडे पैसे आहेत, मोठ्या उद्योगपतींचे १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज भाजपा सरकारने माफ केले पण शेतकऱ्यांना देण्यासाठी भाजपा सरकारकडे पैसे नाहीत. भाजपा सरकार हे शेतकरी विरोधी आहे. शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती असल्याने त्यांचे कर्जमाफ केले पाहिजे अशी मागणी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने ११ जून २०२४ रोजी महामहीम राज्यपाल यांची भेट घेऊन केली होती. राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात ही काँग्रेस पक्षाने राज्य सरकारकडेही यासंदर्भात मागणी केली पण गेंड्याच्या कातडीच्या महाभ्रष्टयुती सरकारला शेतकऱ्यांकडे लक्ष द्यायला वेळ नाही.

# सांगलीच्या पूरपट्ट्यातील नागरिकांचे स्थलांतर सुरू

## आयर्विन पुलाजवळील पाणीपातळी ३० फुटांवर

देशोन्नती वृत्तसंकलन



**सांगली :** आयर्विन पुलाजवळील पाणीपातळी ३० फुटांवर गेल्यानंतर सांगलीच्या सूर्यवंशी प्लॉटमध्ये पुराचे पाणी दाखल झाले. याठिकाणच्या १० कुटुंबांचे बुधवारी स्थलांतर करण्यात आले. पाणीपातळीत वाढ झाली तर परिसरातील आणखी काही कुटुंबांचे स्थलांतर करावे लागणार असल्याचे महापालिका प्रशासनाने सांगितले.


सांगलीच्या सूर्यवंशी प्लॉटमध्ये मध्यरात्री पाणी दाखल झाले. येथील आठ घरांना पाण्याने वेढले. त्यामुळे महापालिकेच्या सूचनेनुसार काही कुटुंबांनी नातेवाईकांकडे तर काहींनी महापालिकेच्या पुनर्वसन केंद्रात स्थलांतर केले. कोयना धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम राहिल्यास कृष्णेच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेने सूर्यवंशी प्लॉटमधील सर्व नागरिकांसह इनामदार प्लॉट, कर्नाळ रोड, शिवमंदिर परिसर, मगरमच्छ कॉलनीतील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

# करूळ घाटात डोंगरकडा कोसळली

## वैभववाडी-कोल्हापूर वाहतूक पुन्हा ठप्प

देशोन्नती वृत्तसंकलन

**वैभववाडी / सिंधुदुर्ग :** पावसाचा जोर सोमवारपासून कमी झाला असला तरी अजूनही पडझडीचे प्रकार सुरूच आहेत. तळेरे-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गावर गगनबावडा-कोल्हापूर किरवे ते लोंघे रस्त्यावर पुराचे पाणी आल्यामुळे वाहतूक ठप्प झाली आहे, तर वाहतूक बंद असलेल्या करूळ घाटात या आठवड्यात दुसऱ्यांदा डोंगर रस्त्यावर कोसळला आहे.



गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा सोमवारपासून (ता.२२) जोर ओसरला आहे. मात्र, वादळीवाऱ्यांसह अधूनमधून जोरदार सरी कोसळत आहेत. सोमवारी सायंकाळी तळेरे-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गावर मांडकुली, खोकुर्ले येथील पाणी ओसरल्याने वाहतूक सुरू करण्यात आली होती; परंतु कोल्हापुरात झालेल्या मुसळधार पावसामुळे किरवे ते लोंघेदरम्यान पुन्हा रस्त्यावर पाणी आले आहे. त्यामुळे हा मार्ग पुन्हा वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. त्यामुळे या महामार्गावरील वाहतूक फोंडा घाटमार्गे वळविण्यात आली आहे.

पावसाचा जोर जरी कमी झाला असला तरी अनेक ठिकाणी जोरदार वाऱ्यामुळे पडझडीचे प्रकार सुरूच आहेत. वैभववाडी-गगनबावडा दरम्यान करूळ घाटात मंगळवारी (ता.२३) सायंकाळी पुन्हा डोंगर कोसळला. दगड, माती आणि झाडांच्या भरावाने ६० ते ७० मीटरचा रस्ता व्यापला आहे; परंतु सध्या हा घाटरस्ता वाहतुकीस बंद असल्यामुळे या पडझडीचा परिणाम जाणवला नाही. सतत कोसळणाऱ्या डोंगरांमुळे नव्याने बांधलेल्या रस्त्याचे मोठे नुकसान होत आहे. पावसाच्या हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी पडत आहेत. काही भागांत वादळीवाऱ्यांसह सरी पडत आहेत. त्यामुळे काही मार्गांवर झाडे उन्मळून पडणे, वीजवाहिन्या तुटण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

# खडकवासला ९६ टक्के भरले; मुठा नदीत विसर्ग

## नदीपात्रातील नागरिकांना खबरदारीच्या सूचना



**पुणे :** पुणे शहरात मागील २ दिवसांपासून संततधार पाऊस सुरू झाला आहे. धरण क्षेत्रातही पावसाचा जोर कायम राहिल्याचे दिसून आले आहे. खडकवासला धरण प्रकल्पात ६० टक्क्यांपेक्षा जास्त पाणीसाठा झाला आहे. तर खडकवासला धरण आतापर्यंत तब्बल ९६ टक्के भरले आहे. आज पहाटे ३ वाजल्यापासून खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रामध्ये २००० क्युसेकने विसर्ग सुरू करण्यात आला आहे. खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रामध्ये सुरू असणारा २०० क्यूसेक्स विसर्ग वाढवून सकाळी ६.३० वा. ४७०८ क्यूसेक्स करण्यात आला. त्यानंतर मुठा नदी पात्रामध्ये सुरू असणारा ४७०८ क्यूसेक्स विसर्ग वाढवून सकाळी ७.०० वा. ९४१६ क्यूसेक्स करण्यात आला.



**सातारा :** जिल्ह्यात फळबाग लागवडीखालील क्षेत्रात वाढ होत असून, राज्य पुरस्कृत भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतून १०० टक्के अनुदान मिळत आहे. यामुळे शेतकऱ्यांना फायद्याचे ठरले आहे.

# बनावट नोटांच्या प्रकरणात रत्नागिरी जिल्ह्यातील चौघांना अटक

## 7 लाखांच्या बनावट नोटा जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन

**रत्नागिरी :** बाजारात बनावट नोटांची हेराफेरी करणाऱ्या कार्पेंटर, चालकासह चौकडीचा पर्दाफाश करत गुन्हे शाखेने कारवाई केली आहे. गुन्हे शाखेने शहानवाज शिरलकर (५०), राजेंद्र खेतले (४३), संदीप निवलकर (४०) आणि ऋषिकेश निवलकर (२६) यांच्याविरुद्ध मानखुर्द पोलिसठाण्यात गुन्हा नोंदवत त्यांच्यावर अटकेची कारवाई केली आहे. शिरलकर आणि खेतले हे चिपळूणमधील रहिवासी आहेत. खेतले हा व्यवसायाने चालक असून शिरलकर याचे सर्व्हिसिंग सेंटर आहे. संदीप आणि ऋषिकेश हे व्यवसायाने सुतार असून ते खेडमधील रहिवासी आहेत.



गुन्हे शाखेने दिलेल्या माहितीनुसार, मानखुर्द उड्डाणपुलाजवळ काही जण कारने बनावट नोटा वितरित करण्यासाठी येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या कक्ष १० ला मिळाली. त्यानुसार पथकाने मानखुर्द उड्डाणपुलाजवळ सापळा रचला. दुपारी सव्वादोनच्या सुमारास संशयास्पद कार तेथे येऊन थांबली. पोलीस पथकाने कारला घेराव घालत कारमधील शहानवाज शिरलकर, राजेंद्र खेतले, संदीप निवलकर आणि ऋषिकेश निवलकर यांची आणि गाडीची झडती घेतली. कारमध्ये पाठीमागच्या सीटवर बसलेल्या निवलकर याच्याजवळील कापडी पिशवीमध्ये पोलिसांना भारतीय चलनातील १०० आणि २०० रुपयांच्या बनावट नोटा सापडल्या.

गुन्हे शाखेच्या पथकाने नोटा जप्त करत चारही संशयितांना कारसह ताब्यात घेऊन मानखुर्द पोलीस ठाण्याच्या चौकीत नेले. तपासणीमध्ये १०० रुपयांच्या १ हजार ६००, २०० रुपयांच्या दोन हजार ४०० आणि ५०० रुपयांच्या ३०० अशा एकूण सात लाख १० हजार रुपये किमतीच्या एकूण चार हजार ३०० बनावट नोटा सापडल्या.

# तापमानातील चढ-उतारामुळे डेंग्यूसह व्हायरल ताप

## झिकापेक्षा डेंग्यूचा धोका अधिक



देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणे:** वातावरणातील बदल अन् तापमानातील चढ-उतारामुळे आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. पावसाची रिपरिप, हवेतील आर्द्रता आणि त्यातच डासांचे वाढलेले प्रमाण आदी कारणांमुळे सध्या पुण्यात व्हायरल रुग्णांची संख्या प्रचंड वाढली आहे.

त्यामुळे खासगीसह सरकारी दवाखान्यांमध्ये प्रचंड गर्दी होत आहे. घरोघरी कोणी ना कोणी आजारी पडल्याने संपूर्ण कुटुंबच डिस्टर्ब झाल्याचे चित्र शहरात अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. आरोग्य विभाग सध्या झिकावर लक्ष ठेवून आहे. मात्र, त्या तुलनेत व्हायरलमुळे तापाने फणफणणारी रुग्ण संख्या प्रचंड वाढली आहे.

सध्या झिकाचे रुग्ण वाढत आहेत. त्याची चर्चा होत आहे; परंतु, त्याच्या कैकपटीने व्हायरल आणि डेंग्यू रुग्णांची संख्या वाढत आहे. जुलै महिन्यापासून पावसाला सुरुवात झाली असून या काळात विषाणूजन्य आजारांची संख्या वाढली आहे. यामध्ये ताप, खोकला, घसादुखी, अंगदुखी या लक्षणांनी घरातील कोणी ना कोणी आजारी पडले. त्यांचा संसर्ग कुटुंबातील इतर सदस्यांनाही झाला असून काही ठिकाणी तर संपूर्ण घरच आजारी पडलेले दिसून येत आहे. याला लहान मुलेही अपवाद नाहीत. त्यामुळे मुलांच्या शाळेला दांड्या आणि मोठ्यांचीही कामावर गैरहजेरी पडत आहे.

**डेंग्यूचे थैमान**

शहरात रिपरिप पाऊस सुरू असल्याने पाणी साचून राहते. अशा ठिकाणी डास अंडी घालतात. त्यातून मोठ्या प्रमाणात डासांची पैदास होते. त्यामुळे डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढली आहे.

# कृषिमाल निर्यातीसाठी 300 कोटींचे कृषिप्रक्रिया अन् साठवण केंद्र

## २५ एकरात होणार प्रकल्प

देशोन्नती वृत्तसंकलन

**उरण /रायगड :** महाराष्ट्रातील नव्हे तर देशभरातील शेतकऱ्यांच्या कृषिमाल किफायतशीर दरात आयात-निर्यात करण्यासाठी ३०० कोटींची गुंतवणूक करून अद्ययावत डीबीएफओटी मॉडेलमधील ॲग्रो प्रोसेसिंग आणि स्टोरेज युनिटची उभारणी जेएनपीए करणार आहे.

सर्व सोयी-सुविधा असलेले २५ एकरमध्ये उभारण्यात येणारे हे युनिट २०२६ मध्ये कार्यान्वित होईल, अशी माहिती जेएनपीए अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली. काही दिवसांपासून जेएनपीए बंदरातील मालवाहतुकीवर झालेल्या परिणामांची कारणमीमांसा करण्यासाठी सोमवारी प्रशासन भवनात पत्रकार परिषद घेतली. विशेष म्हणजे शेतकऱ्यांचा कृषिमाल निर्यात करण्यापूर्वीच या ठिकाणीच तपासणी करून प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश व इतर राज्यांतील शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ होणार असून, हा प्रकल्प २०२६ पर्यंत कार्यान्वित होणार असल्याचे वाघ म्हणाले.

## लोणावळा शहरामध्ये यावर्षीच्या सर्वाधिक पाऊस

**लोणावळा :** शहरामध्ये दीड महिन्यामधील मंगळवारी झालेला पाऊस हा सर्वाधिक पाऊस झाला आहे. आठ दिवसापासून शहरात पावसाचा जोर कायम आहे. शहरात तब्बल २७५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. नांगरगाव आदर्श सोसायटी समोरील रस्ता, शहाणी हॉलिडे होम समोरील रस्ता, वलवण नांगरगाव रस्ता, बाजारभागातील रस्ते अशा अनेक रस्त्यांवर पाणी साचले आहे.

# जोगेश्वरीमधील इमारतीला भीषण आग

## चारजण जखमी

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई :** जोगेश्वरीमधील एस. व्ही. मार्गावरील दिल्ली दरबार हॉटेलनजीकच्या 'ई-हाय' या बहुमजली इमारतीमध्ये बुधवारी सकाळी ९ च्या सुमारास भीषण आग लागली होती. या दुर्घटनेत चारजण जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जोगेश्वरी येथील २० मजली 'ई-हाय' टॉवरमध्ये लागलेली आग १५ ते २० व्या मजल्यादरम्यान पसरली होती. विजेच्या तारांच्या आणि विद्युत यंत्रणेच्या संपर्कात आल्याने आगीचा भडका उडाला. दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी बचावकार्य हाती घेतले. आगीची वाढती तीव्रता लक्षात घेऊन सकाळी ९ वाजून २४ मिनिटांनी क्रमांक एकची वर्दी देण्यात आली. इमारतीत अडकलेल्या काही रहिवाशांना अग्निशामकांनी सुरक्षित स्थळी हलविले.



**कोल्हापूर :** आजरा-गांधीनगर रस्त्यावरील १५० वर्षांपूर्वीचा वटवृक्ष कोसळला आहे. मुसळधार पडणारा पाऊस व जोरदार सुटलेला वाऱ्यामुळे अनेक ठिकाणची झाडे रस्त्यावरून उन्मळून पडली आहेत. महाकाय वटवृक्ष कोसळल्याने या मार्गावरील वाहतूक बुधवारी ठप्प झाली होती.

# 'वायसीएम'च्या 'त्या' डॉक्टरांना 'क्लीन चिट'

## आयएएस पूजा खेडकर दिव्यांग प्रमाणपत्र प्रकरण

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणे:** आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांना वाय.सी.एम रुग्णालयाने सात टक्के दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र दिले होते. यानंतर वायसीएम रुग्णालयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. जिल्हाधिकारी यांनी चौकशीचे आदेश यशवंतराव चव्हाण रुग्णालयाचे अधिष्ठाता राजेंद्र वाबळे यांना दिले होते. चौकशीअंती दिव्यांग प्रमाण पत्राबाबत संबंधित डॉक्टरांना क्लिन चिट देण्यात आली आहे. चौकशीत कोणीच दोषी आढळले नसल्याची माहिती राजेंद्र वाबळे यांनी दिली आहे.



वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांना वाय.सी.एम रुग्णालयाकडून सात टक्के दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले होते. याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दिव्यांग प्रमाणपत्र देणाऱ्या डॉक्टरांची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. यामध्ये फिजिओथेरपी आणि अस्थीरोग तज्ज्ञ यांच्याकडे राजेंद्र वाबळे यांनी खुलासा मागवला होता.

# सख्ख्या मुलीवर अत्याचार; नराधम बापास 20 वर्षे सक्त मजुरीची शिक्षा



**कोल्हापूर :** सख्ख्या मुलीवर अत्याचार केल्याने नराधम बापास २० वर्षे सक्त मजुरीची शिक्षा येथील न्यायालयाने बुधवारी सुनावली. जगन्नाथ यशवंत आडके (४७)रा. कोडोली ता. पन्हाळा असे त्याचे नाव आहे.

जगन्नाथ आडके कोडोली या गावी पत्नी, तीन मुली यांच्यासमवेत राहत होता. पती-पत्नी दोघेही मोलमजुरी करून गुजराण करीत असत. २२ जानेवारी २०२२ रोजी साडेपाच वर्षांची पीडित मुलगी शाळेतील गॅदरिंग संपल्यानंतर घरी आली. तिने गुप्त जागी दुखत असल्याची आईकडे तक्रार केली. आईने खोदून चौकशी केली असता रात्रीच्या वेळी वडिलांनी कशाप्रकारे अत्याचार केला याची सविस्तर माहिती दिली.

## आश्रम शाळेच्या विद्यार्थिनीने स्वतःला पेटवून घेतले

### ९० टक्के भाजल्याने मृत्यू

**पालघर :** जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात देहरे (किरमिरा) या आश्रम शाळेतील एका १७ वर्षीय युवतीने स्वतःला पेटवून आत्महत्या करण्याचा धक्कादायक प्रकार घडला. देहरे आश्रम शाळेत ११ वी इयत्ते मध्ये शिकणाऱ्या पायलने दुपारच्या वेळी आश्रम शाळेच्या तिसऱ्या मजल्यावर स्वतःच्या अंगावर पेट्रोल टाकून पेटवून घेतले. ही घटना समजल्यानंतर आश्रम शाळेतील शिक्षकाने तिला जव्हार येथील उपजिल्हा रुग्णालयात आणले.

# आता थेट शेतापर्यंत रस्ता

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई :** राज्यात 'मातोश्री ग्राम समृद्धी शेत-पाणंद रस्ते योजना' नोव्हेंबर- २०२१ सालापासून कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश असा की, शेतमाल पोहोचविण्यासाठी रस्ते नसल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते.

हीच बाब लक्षात घेऊन शासनाने 'मातोश्री ग्राम समृद्धी शेत-पाणंद योजना' लागू केली आहे. या योजनेला शेतकऱ्यांकडून चांगला प्रतीसाद मिळतोय. शेतीमधील कमी होणारी मनुष्यबळाची उपलब्धता लक्षात घेता शेतीची कामे करण्यासाठी यंत्रांचा उपयोग केला जातो. यांत्रिकीकरणामुळे शेतीमध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी व इतर कामे करण्यासाठी, यंत्रसामुग्री शेतापर्यंत नेण्यासाठी आणि शेतमाल बाजारात पोहचविण्याकरिता बारमाही शेतरस्त्यांची आवश्यकता असते.

रस्ते तयार करून शेतकऱ्यांना सुविधा देण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राज्यात 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदरील योजना २७ फेब्रुवारी २०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे 'मातोश्री शेत/पाणंद रस्ते योजना' राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेत वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

### सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मापदंडाप्रमाणे

या योजने अंतर्गत अस्तित्वातील शेत/पाणंद कच्च्या रस्त्यांचे मजबुतीकरण करणे, रस्ता अतिक्रमणमुक्त करून कच्चा व पक्का रस्ता एकत्रितपणे करणे अशी कामे घेता येणार आहे. राज्यातील सर्व शेत/पाणंद रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (जिल्हा परिषद आणि शासन) मापदंडाप्रमाणे बांधण्यात येणार आहेत. यात फक्त जागेच्या उपलब्धतेप्रमाणे रुंदीमध्ये फरक पडेल. मात्र, रस्त्यांची उंची, खडीचे आकार, खडीच्या परताची जाडी, रस्त्याच्या दोन्ही बाजूचे निचऱ्यासाठीचे नाले, रस्त्यांच्या बाजूला वृक्ष लागवड, गुणवत्तेची चाचणी इत्यादी सर्व बाबी मानक मापदंडाचे असणार आहेत.

### मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंद रस्ते योजना



# एलसीबी शाखेची २७ कोटी ६० लाखाची हप्ते वसुली!

- खा.निलेश लंकेंनी उघड केली धक्कादायक माहिती
- बोंबला! चक्क जाहीर केले पोलीसांचे रेट कार्ड
- हप्ते खोरीची राज्यात उडाली मोठी खळबळ
- मोजक्या काही लोकांमुळे पोलीस खाते बदनाम!

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

नगर पोलीसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कडून दर महा २७ कोटी ६०लाख रुपयांचे हप्ता वसुली करण्यात येत असल्याची धक्कादायक माहिती खा निलेश लंके यांनी जाहीर केली या वेळी त्यांनी पोलीस वसुल करत असलेल्या हप्त्याचे रेट कार्डच जाहीर केले



या वेळी बोलताना खा निलेश लंके म्हणाले की पोलीस दलातील दोन टक्के अधिकारी व कर्मचारी यांच्यामुळे संपूर्ण पोलीस दलच बदनाम झाले आहे समाज भयभीत झाला आहे अवैध धंद्यांना कोण पाठीशी घालत आहे कुणाचा तपास लागत नाही स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर हे चुकीच्या कर्मचाऱ्यांची ऑर्डर आपल्या विभागात करून घेतात सायबर विभागात बदली असलेले कर्मचारी स्थानिक गुन्हे शाखेत काम करतात याच विभागाचे प्रोत्साहन पर बक्षिसे घेतात आज ह्याच विभागाच्या चव्हाण नामक कर्मचाऱ्यांच्या विरोधात लाच लुचपत विभागामार्फत गुन्हा दाखल करण्यात आला तरीही आता पोलीस प्रशासनात पुरावे हवेत का असावा लंके यांनी केला

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्राजक्त तनपुरे म्हणाले की काही अधिकारी व कर्मचारी हे पोलीस दलास कलंक असून वरिष्ठ पातळीवरून अधिकारी त्यांना पाठीशी घालत आहे हे दुर्दैव आहे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी खा यांच्या उपोषणास तीन दिवस झाले तरी पोलीस अधिकारी भेटी साठी का येत नाहीत असा प्रश्न उपस्थित केला भष्टाचारास राज्याच्या गृह खात्याचे पाठबळ आहे असा संदेश जाईल या विरोधात राज्य पातळीवर आंदोलन केले जाईल असे ते म्हणाले

### खा निलेश लंके यांनी हप्ते वसुलीचे जाहीर केले रेट कार्ड

चंदन तस्करी रेशनिंग ४० लाख, हिरा गुटखा ६८लाख, विमल गुटखा ६० लाख, आर एम डी गुटखा २५ लाख, नगर शहर कॅफे ५०लाख,वाळू ट्रॅक्टर दोन २५०लाख, वाळू गाडी ४कोटी ८० लाख, पोकलेन ५०लाख, आयपीएल सट्टा ५०लाख, वेश्या व्यवसाय हॉटेल ३ लाख, अवैध व्यवसाय ५५ लाख, मटका सात कोटी ५५ लाख, बिंगो एक कोटी चाळीस लाख, मावा तीन १कोटी ३०लाख, दारू हॉटेल ७५लाख, डिझेल पेट्रोल तस्करी १२ लाख ५० हजार, ट्रक रिक्षा दहा लाख, जुगार ७५लाख

## जलजिवन विहीरीचे पीतळ उघडे?

प्रश्नचिन्ह : पंचायत समिती उत्तर देणार का?



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे बोबडेवाडी येथील केज नदीपात्रातील जलजिवन मिशन योजने अंतर्गत झालेल्या विहीरीचे पीतळ पडणार उघडे कारण रतनराव बोबडे यांनी दीलेल्या जनमाहिती अधिकारातून जलजिवन मिशन योजने अंतर्गत झालेल्या विहीरीच्या कामात केलेला महाघोटाळा उघडकीस येणार आहे तरी जलजिवन मिशन योजने अंतर्गत झालेल्या विहीरीच्या कामात काळाबाजार करण्यात आलेला असुन गुत्तेदार , अधिकारी यांचे पीतळ उघडे पडणार असल्याचे समजले जाते आहे.तरी मौजे बोबडेवाडी ता. केज जि.बीड येथील केजडी नदीचे पात्रात जल जिवन मिशन योजनेतील विहिरीची प्रस्थावीत केलेल्या कार्यवाही बाबतची आणि कार्यारंभापासून अद्दप पर्यंतची माहिती मिळणे बाबत पाणीपुरवठा उपविभागीय अधिकारी पंचायत समिती केज यांच्या कडे माहिती अधिकार देण्यात आला असून पंचायत समिती उपविभागीय अधिकारी उत्तर देनार का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

## खिडकीतून शिरला खरे पण घडलं भलतंच!

व्हायरल सत्य : केज बसस्थानक येथील घटना

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

बस स्टँडवर एस टी मध्ये चढताना गर्दी असल्यास काहीजण खिडकीतून रुमाल किंवा टोपी टाकून जागा पकडतात; पण आता तर खिडक्या मोठ्या असल्याने काहीजण चक्क खिडकीतून आत शिरण्याचा प्रयत्न करतात. अशातच एस टी महामंडळांच्या बसेस खिळखिळ्या झालेल्या असताना एका प्रवाशी खिडकीतून आत शिरत असताना खिडकी निखळून तो प्रवाशी चक्क खाली पडल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झालेला असताना बीड जिल्ह्यातील केज येथील बस स्टँडवर सुद्धा खिडकीतून आत चढणाऱ्या एका प्रवाशाच्या हातात चक्क खिडकीची फ्रेम निखळून हातात आली. सोशल मीडियावर एक प्रवाशी एस टीत प्रवाशांना आत मध्ये चढण्यासाठी असलेल्या दरवाजा ऐवजी चक्क खिडकीतून आत चढत असताना खिडकी हातात येवून ती खाली आपटल्याचा व्हिडिओ व्हारल झाला आहे. तो व्हिडिओ कुठला आहे हे दिसत नाही. मात्र दि २३ जुलै रोजी दुपारी केज येथील बस स्टँडवर कळंब आगाराच्या केज कळंब बस क्र. (एम एच–२०/बी एल ०८१९) ही उभी होती. त्यावेळी बसच्या डाव्या बाजूने काही प्रवाशी हे दरवाजातून आंत चढत होते. त्यावेळी एक तरुण प्रवाशी हा एस टी च्या मागील चाकावर पाय ठेवून चक्क खिडकीतून आत चढत असताना त्याच्या हातात चक्क खिडकीची फ्रेम निखळून आली. त्यामुळे या बसचा वाहक आणि प्रवाशी यांच्यात काही काळ तू तू मैं मैं झाले असल्याचे व्हडिओत दिसत आहे. एस टी बस मध्ये चढत असताना प्रवाशी जागा मिळावी म्हणून जोखीम पत्करित आहेत. मात्र गरीबांचे वाहन असलेल्या या लाल पान २ वर...



## आश्वासनामुळे आंदोलन झाले स्थगित!

निर्णय : क्षेत्रेंचा बैठा सत्याग्रह आंदोलन तुर्तास स्थगित

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या अनागोंदी कारभारासंदर्भात २५/ ७/२०२४पासून बैठा सत्यागह आंदोलन करीत असलेले रिपब्लिकन नेते छानराज क्षेत्रे यांना प्रशासनाने काही मागण्या संदर्भात लेखी दिल्यानंतर बेमुदत बैठा सत्याग्रह आंदोलन काल स्थगित करण्यात आले सर्व मागण्या पैकी एक मागणी होती की अहमदनगर जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना निलंबित करावे परंतु ते अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नसल्याने ज्यांना अधिकार आहेत त्या ठिकाणी कार्यकारी मुख्याधिकारी यांनी शिफारस करावी



शिरसगाव प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत पाथरवाला उपकेंद्र या केंद्रात २०१६ ते २०२२ या कालखंडात जो जन्म मृत्यूचा नोंदीचा घोटाळा आहे यावर मा वैद्यकीय अधिकारी व त्यांचे सर्व कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आले असून त्यांची मुदत देखील आज संपलेली आहे आणि म्हणून मा मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब हे त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करणार आहेत अशी लेखी पत्र मा आरोग्य अधिकारी यांनी दिले आहे. खरवंडी तालुका नेवासा येथील तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांच्या तीन पगार वाढी कायमस्वरूपी बंद करण्यात आल्या असून त्यांच्यावर अजूनही राहिलेली जी काही शिक्षा असेल ती निश्चित करून त्यांच्यावर पुढील कारवाई करण्यात येईल असे देखील मा उप मुख्य कार्यकारी अधिकारी अहमदनगर यांनी लिखित दिले आहे.

तिसगाव तालुका पाथर्डी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची जी इमारत जळाली किंवा जाळली असे आमचे म्हणणे होते त्यावर मा जिल्हा आरोग्य अधिकारी पान २ वर...

## ॲड. शेख शफिक यांचा सत्कार!



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांनी नुकतेच शुक्रवार दिनांक १९ जुलै २०२४ रोजी बीड शहरातील बशीरगंज चौकात कोल्हापूर येथील विशाळगड मध्ये असलेल्या गजापूर च्या जामा मशीदीवर उग्रवाद्यांनी केलेल्या हल्लूयाची निर्भत्सना करत निषेध नोंदविण्यासाठी सर्व समाजाला निषेध आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. याला प्रतिसाद देऊन मुस्लिम समाजासह इतर समाजानेही उत्स्फूर्तपणे या निषेध आंदोलनात हजारोंच्या संख्येने सहभागी होत निषेध नोंदवला होता. यामुळे हे आंदोलन अपेक्षेपेक्षा जास्त यशस्वी झाल्याने बीड शहरातील अनेक तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांकडून शफिक भाऊंचे अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत असून आभार ही व्यक्त केले जात आहे.

बीड जिल्ह्यात परिस्थिती कोणतीही असो, आनंदाची असेल तरीही, दुःखाची असेल तरीही, अडचणीची असेल तरीही फक्त मुस्लिम समाजच नाही तर अन्य समाजालाही जर सर्वप्रथम कुणाचे नाव समोर येते ते एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांचे. प्रत्येकाच्या सुखदुःखात, अडीअडचणी पान २ वर...

## नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करा

दिलासा : खा.बजरंग सोनवणेंचे जिल्हा प्रशासनास पत्र

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्ह्यतील आष्टी/पाटोदा तालुक्यासह इतर तालुक्यातही अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत देण्याची लेखी निवेदनातून मागणी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे शेतकरी पुत्र खा. बजरंग (बप्पा) सोनवणे यांनी केली आहे. बीड जिल्ह्यतील आष्टी/पाटोदा तालुक्यासह इतर तालुक्यातही मागील दोन तीन दिवसांपासून सुरु असलेल्या अतिवृष्टीमुळे व सततधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील कांदा, उडीद, मुग, सोयाबीन, पिकांबरोबर इतर पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तरी या झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पान २ वर...



## राष्ट्रीय मार्गाचे काम तीन महिन्यात पुर्ण

पाठपुरावा : साकेतच्या कंत्राटदारांशी जयदत्त क्षीरसागरांची चर्चा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिरापुर धुमाळ ते जरूड फाटा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू असुन हे काम सध्या ४० टक्के झाले आहे. उर्वरित काम ३ महिन्यात पुर्ण करण्याचे नियोजन असुन या कामात महावितरणचे पोलशिप्टींग,नवीन विद्युत लाईन टाकण्याचे काम सुरू असुन बीड शहरात काही भागात रस्त्यालगत नळ योजनेचे पाईप स्थलांतरीत करण्याचे काम होत आहे. शहरातून जाणारा हा रस्ता लवकर पुर्ण करण्यासाठी युध्द पातळीवर प्रयत्न करत असल्याचे साकेत कन्स्ट्रक्शनच्या कंत्राटदारांनी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याशी बोलताना सांगितले आहे.



माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दोन दिवसापुर्वीच रस्त्यावर काम करणाऱ्या साकेत कन्स्ट्रक्शनच्या कंत्राटदारांशी चर्चा केली. सध्या शिरापुर धुमाळ ते जरूडफाटा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे. या कामामुळे शहरातील व ग्रामीण भागातील नागरीकांना वाहतूकीस त्रास सहन करावा लागत आहे.हा रस्ता मुख्य रहदारीचा आहे.सध्या याचे काम ४० टक्के झाले आहे. ऐन पावसाळ्यात देखील हे काम सुरू आहे.त्यामुळे नागरिकांना वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ लागला आहे,शिरापुर धुमाळ ते जरूडफाटा हा फोर लाईन सिमेंट रस्ता असुन दोन्ही बाजूनी पान २ वर...

व्यथित : पंकजाताई मुंडेंचे कार्यकर्त्यांना आवाहन

## हारतुरे नको फक्त शुभेच्छांचा एसएमएस करा!

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

२६ जुलै रोजी आपला वाढदिवस असून संपूर्ण राज्यातून वाढदिवसाच्या दिवशी ताई तुम्ही कुठे भेटणार? अशा प्रकारचे संदेश मिळत आहेत, तथापि, हारतुरे , सत्कार, बडेजाव असा कोणताही उत्सवी स्वरूपात वाढदिवस साजरा करणे हे सद्य परिस्थितीत समर्पक वाटत नाही, त्यामुळे केवळ आपल्या प्रेमरुपी एका एसएमएस वर वाढदिवसाच्या शुभेच्छा व आशीर्वाद प्रदान मला द्यावेत असं आवाहन भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी राज्यभरातील कार्यकर्त्यांना केलं आहे. दरम्यान, विधानपरिषदेवर आमदार म्हणून निवडून आल्यानंतर पंकजाताई मुंडे यांनी येत्या २९ तारखेला भगवानभक्ती गडापासून परळीपर्यंत आपण महापुरुषांना वंदन करत दौरा करणार असल्याचे सांगितले आहे. वाढदिवसा दिवशी सर्वांनी आहे त्या ठिकाणावरून केवळ एसएमएसवरुन शुभेच्छा द्याव्यात असेही त्यांनी म्हटले आहे.



### महापुरुषांना करणार वंदन

विधान परिषदेवर आमदार म्हणून निवडून आल्यानंतर पंकजाताई मुंडे येत्या सोमवारी २९ जुलै रोजी बीड जिल्ह्यात येत आहेत. स्वतःचा सत्कार न घेता जिल्हयातील विविध ठिकाणी महापुरुषांना त्या वंदन करणार आहेत.


पंकजाताई मुंडे यांनी वाढदिवसाच्या अनुषंगाने आपल्या समर्थकांना आवाहन करणारा एक व्हिडिओ प्रसारित केला असून या व्हिडिओमध्ये त्यांनी सर्वांना विनंतीवजा आवाहन केले आहे. त्या म्हणाल्या, माझा वाढदिवस उत्सवी स्वरूपात साजरा करावा हे मला पान २ वर...

## बालविवाह झाल्यास पोलिसांनी चार्जशीट दाखल करावी

बैठक : जिल्हाधिकाऱ्यांचे पोलिसांना स्पष्ट निर्देश

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्ह्यात बालविवाह झाल्यास पोलिसांनी गुन्हा नोंदवून चार्जशीट दाखल करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी बुधवारी बाल विवाह निर्मूलन विषयी झालेल्या आढावा बैठकीत दिले.जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी श्री पाठक यांच्या अध्यक्षतेत बालविवाह निर्मूलन या विषयावर आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर केकान, ज्ञानेश्वर मोकाटे, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी सुधीर ढाकणे, यांच्यासह अध्यक्ष बाल समिती, जिल्हा समन्वय चाइल्ड लाईन युनिसेफच्या प्रतिनिधी सोनिया हांगे उपस्थित होत्या.



बुधवारी झालेल्या बैठकीत ०१ एप्रिलपासून १४९ बालविवाह थांबविण्यात आले, असून दोन गुन्हे दाखल करण्यात आले मात्र अद्याप त्यावर चार्जशीट न झाल्यामुळे बालविवाह होतच आहेत. बालविवाह करणे हे कायद्याने गुन्हा असून देखील जिल्ह्यामध्ये त्याची वारंवारता बघायला मिळते. बालविवाह मुळे मुलीच्या शैक्षणिक, शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकास थांबून जातो हे वारंवार पान २ वर...